explore where your skills need further development. In the analysis sections underneath, we'll direct you to the resources you need to be an exceptional leader. Leading a team or group is a real skill that takes time, thought and dedication. Leadership is the most studied aspect of business and organization because it is the one overarching topic that makes the difference between success and failure. At times it may seem overwhelmingly complex, but by focusing on some fundamentals you will find that you can lead your team with confidence and skill. The ability to lead effectively is based on a number of key skills. These skills are highly sought after by employers as they involve dealing with people in such a way as to motivate, enthuse and build respect.

THE NATURE OF LEADERSHIP

True leadership is special, subtle, and complex. Too often we confuse things like personal style and a position of authority with leadership.

- Leadership is not primarily a particular personality trait. A trait closely linked to leadership is charisma, but many people who have charisma (for example, movie actors and sports figures) are not leaders.
- Leadership is not primarily a set of important objectives. It involves getting things done.
- Leadership is not primarily a formal position. There have been great leaders who did not hold high positions—for example, Martin Luther King, Jr. and Jeanne d'Arc—and there are people who hold high positions who are not leaders at all, but administrators who don't want to rock the boat.
- Leadership is not primarily a set of behaviors. Many leadership manuals suggest that what defines leadership is things such as delegating and providing inspiration and vision; but people who are not leaders can do these things, and some effective leaders don't do them all.

1. CREATING AN INSPIRING VISION OF THE FUTURE

In business, a vision is a realistic, convincing and attractive depiction of where you want to be in the future. Vision provides direction, sets priorities, and provides a marker, so that you can tell that you've achieved what you wanted to achieve.

2. MOTIVATING AND INSPIRING PEOPLE

A compelling vision provides the foundation for leadership. But its leaders' ability to motivate and inspire people that helps them deliver that vision. For example, when you start a new project, you will probably have lots of enthusiasm for it, so it's often easy to win support for the project at the beginning. However, it can be difficult to find ways to keep your vision inspiring after the initial enthusiasm fades, especially if the team or organization needs to make significant changes in the way that they do things. Leaders recognize this, and they work hard throughout the project to connect their vision with people's individual needs, goals, and aspirations.

3. MANAGING DELIVERY OF THE VISION

This is the area of leadership that relates to management. Leaders must ensure that the work needed to deliver the vision is properly managed – either by themselves, or by a dedicated manager or team of managers to whom the leader delegates this responsibility – and they need to ensure that their vision is delivered successfully.

4. COACHING AND BUILDING A TEAM TO ACHIEVE THE VISION

Individual and team development are important activities carried out by transformational leaders. To develop a team, leaders must first understand team dynamics. Several well-established and popular models describe this, such as Belbin's Team Roles approach, and Bruce Tuckman's Forming, Storming, Norming, and Performing theory

IMPORTANT LEADERSHIP SKILLS

- Commitment, resolve and perseverance – driving every aspect of the organization toward a singular unified purpose.
- Risk-taking – breaking conventions and developing new products and services to establish marketplace dominance (and possibly even create a unique market).
- Planning – though a leader typically doesn't get too involved in the details, he or she must orchestrate a high-level plan that drives everyone toward the unified goal.
- Motivating – an effective leader must be able to encourage contributions from the entire organization, navigating the specific motivators of each individual or group to push the right

buttons and inspire employees at every level to achieve not only their personal best but the best for the organization as a whole.

- Communication skills that rely on active listening – far more than just being able to speak and write persuasively, leadership communication skills incites others to work toward the stated goal in line with the path the leader has chosen.
- Possessing or obtaining the skills required to successfully achieve business goals – bringing a unique knowledge set to the table or acquiring it personally or through employees and other subordinates.

FIRST, TAKE TIME TO HONESTLY ANALYZE YOURSELF

Learn to understand yourself. It's the first step to understanding others. Consider these important questions:

1. What kind of leader am I? One who helps solve problems? A leader who helps people get along? How do others see me as a leader?
2. What are my goals, purposes, and expectations in working with this particular group?

Identify areas for improvement. Ask yourself these questions:

1. Do I try to be aware of how others think and feel?
2. Do I try to help others perform to the best of their abilities?
3. Am I willing to accept responsibility?
4. Am I willing to try new ideas and new ways of doing things?
5. Am I able to communicate with others effectively?
6. Am I a good problem solver?
7. Do I accept and appreciate other perspectives and opinions?
8. Am I aware of current issues and concerns on campus or in my community?

Then--after analyzing your strengths and weaknesses--take action. Devise a strategy for upgrading your skills. Here are a few strategies to consider:

1) COMMUNICATE EFFECTIVELY.

Effective communication is dialogue. Barriers are created by speaking down to people, asking closed questions that elicit yes or no answers, using excessive authority, and promoting a culture that depends on unanimity. If your focus is winning the argument or if you react defensively to criticism, you'll create fear of openness and hinder the organization's growth.

2) ENCOURAGE ENTHUSIASM AND A SENSE OF BELONGING. SHOW:

- Friendliness: others will be more willing to share ideas if you're interested in them as people too.
- Understanding: everyone makes mistakes. Try to be constructive, tolerant and tactful when offering criticism.
- Fairness: equal treatment and equal opportunity lead to an equally good effort from all group members.

3) KEEP EVERYONE WORKING TOWARD AGREED UPON GOALS:

- Remind everyone of the group's purposes from time to time. It's easy to become too narrowly focused and lose sight of the larger goals.
- Provide encouragement and motivation, by showing your appreciation for good ideas and extra effort.
- Harmonize differences and disagreements between group members by stressing compromise and cooperation.
- Involve everyone in discussions and decisions, even if asking for opinions and ideas means a longer discussion.

4) GET TO KNOW THE PEOPLE AROUND YOU

Everyone has different abilities, wants, needs, and purpose in life. To get along with others and get results, you need to get to know them.

- Interact with group members as often as possible. The only way to get to know someone is through direct personal contact.
- Become familiar with every member of your group. Take note of each person's unique qualities and characteristics.

5) TREAT OTHERS AS INDIVIDUALS

Put your knowledge and understanding of each group member to work!

- Be aware of expectations. Everyone expects something different: recognition, a chance to learn, a chance to work with other people, etc.
- Be creative. A repetitious routine can cause boredom. A successful leader thinks of new and better approaches to old ways of doing things.
- Provide rewards. Recognition by the group is a source of personal satisfaction and positive reinforcement for a job well done.

6) ACCEPT RESPONSIBILITY FOR GETTING THINGS DONE

- Take the initiative. Why stand around and wait for someone else to get things started? Set an example.
- Offer help and information. Your unique knowledge and skills may be just what's needed.
- Seek help and information. Ask for advice if you need it. This will encourage group involvement and help accomplish group goals.
- Make things happen. By being decisive, energetic, and enthusiastic, you can and will help get things done!

7) PROBLEM SOLVE IN A STEP-BY-STEP WAY

Whether you are faced with a decision to make or a conflict to resolve, following a logical approach will help.

1. State the problem as simply and clearly as possible.
2. Gather all relevant information and available resources.
3. Brainstorm as many ideas or solutions as you can think of (with others if possible).
4. Evaluate each idea or solution and choose the best one.
5. Design a plan for using your idea or solution. Include a timetable, assigned roles, and resources to be used.
6. Follow up on your plan by asking if your idea worked and why or why not.

CONCLUSION

Leadership can be hard to define and it means different things to different people.In the transformational leadership model, leaders set direction and help themselves and others to do the right thing to move forward. To do this they create an inspiring vision, and then motivate and inspire others to reach that vision. They also manage delivery of the vision, either directly or indirectly, and build and coach their teams to make them ever stronger.Effective leadership is about all of this – and it's exciting to be part of this journey.

REFERENCE

❖ How to be an Effective leader – 2010
❖ Leadership Skills - 2004
❖ Strengths Based leadership – Tom Rath, Barry Conchie – 2009
❖ The leadership challenge – Kouzes Posner – 1987
❖ The seven habits of highly effective people- Stephen Covey- 1989

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
with
International Impact Factor 2.254

ISSN No. 2394-8426
Dec – 2015
Issue – I, Volume – V
Online Journal

चंद्रपूरचा गोंड राजवंश

प्रा. डॉ. गौतम ए. शंभरकर
जनता महाविद्यालय, चंद्रपूर

सारांश :

रामचंद्रदेव यादवाच्या काळात खिलजी आक्रमणाने त्याचे राज्य डळमळीत झाले होते. रामचंद्रदेवाने अल्लाउद्दीनशी समझोता करून खंडणी देण्याचे मान्य केले. 1305–1306 मध्ये देवगिरीच्या यादवांनी खंडणी बंद करताच सेनापती मलिककाफुरने देवगिरीवर विजय मिळवून खंडणी वसूल केली.[3] यादवांची सत्ता डळमळीत झाल्याचे पाहून वैरागडच्या राजाने बंड केले. ते बंड मोडण्याच्या दृष्टीने जेव्हा मलिककाफूरने 1309 मध्ये वारंगळवर स्वारी केली. तेव्हा रामचंद्रदेवाचे सैन्य त्यास मिळाले. वारंगळच्या परभवानंतर अल्लाउद्दीनशी मैत्री वाढवून चांदा प्रदेशातील सत्ताधिशांना भयभित करून वैरागडच्या राजाचा मुलोच्छेद केला. परंतु हा प्रदेश यादवांच्या राज्यात जास्त दिवस राहिला नाही. कारण यावेळी यादवांचीच सत्ता कमजोर झाली होती. या अस्थिरतेच्या काळात गोडांना प्रगतीची संधी मिळाली. अर्थात देवगिरीचे यादव, नागवंशीय माना आणि माळव्याचे परमार यांचे या प्रदेशावरील प्रभुत्व संपुष्टात आल्यावर या प्रदेशात चौदाव्या शतकाच्या पूर्वार्धात गोंडाचा उदय झाला. मानानागवंशीयांचे वैरागड येथील अधिपत्य बाराव्या–तेराव्या शतकात संपुष्टात येत असल्याचे पाहुन आंध्रप्रदेशातील जुनगांव–मोवाड ते शिरपूर–माणिकगड या भागात तेराव्या शतकात राजगोंड जमातीतील कोलभिल्ल नावाच्या पराक्रमी पुरूषाने देवगिरीच्या यादवांची व वैरागडच्या माना नागवंशियांची सत्ता कमजोर झाल्याचे पाहून यादवांची व नागांची सत्ता समाप्त केली. त्याने गोंडाचे राजकीय संघटन करून नागांचा बालेकिल्ला माणिकगढ जिंकून गोंड राजवटीस प्रारंभ केला.[4] चंद्रपूर राज्यात एकून तेवीस गोंड राजांनी राज्य केले. त्या गोंड राजवटीचा थोडक्यात आढावा या लेखात घेण्यात आला आहे.

बीजशब्द :

पहिली राजधानी शिरपूर व गोंडराजे, दुसरी राजधानी बल्लारपूर व गोंड राजे, तीसरी चंद्रपूर राजधानी व गोंड राजे.

प्रस्तावना :

चंद्रपूर शहरास कृतयुगात लोकपूर, द्वापारयुगात इंदुपुर, गोंडकाळात चंद्रपूर, ब्रिटीश काळात चांदा आणि 1964 मध्ये स्वातंत्र्यानंतर पुन्हा चंद्रपूर अशी नावे होती. वन्य जमातीला आदिवासी जमात म्हणून संबोधले जाते. आदिवासींच्या सुमारे दोनशे जातीमध्ये गोंड जमात प्रमुख होती. या गोंड जमातीचा विस्तार जबलपूरपासून तेलंगणापर्यंत उत्तर–दक्षिण आणि वऱ्हाडच्या सातपुडयापासून छत्तीसगडापर्यंत पूर्व–पश्चिम असा होता. पर्वताच्या आश्रयाने राहणाऱ्या व विशिष्ट वन्य धर्माचे पालन करणाऱ्या लोकास तेलगू लोक कोंड म्हणत होते. कोंड या शब्दाचा अपभ्रंश गोंड असा झाला आहे.[1] गोंड, राजगोंड, माडियागोंड या जाती दक्षिण गोंडवणात आढळतात. ते घनदाट अरण्यात, डोंगर प्रदेशात निवास करीत असल्यामुळे त्यास गोंडवन म्हणून ओळखले जाते. या गोंडवनाचे प्रादेशिक रचनेवरून उत्तर गोंडवन, मध्य गोंडवन, दक्षिण गोंडवन असे तीन उपविभाग पडतात. या गोंडवनात देवगड, गढामंडला, खेरला व चंद्रपूर ही चार मोठी राज्ये प्रसिध्दीस आली.[2] याच गोंड लोकांनी या प्रदेशातील जंगले साफ करून ती जमीन शेतीयोग्य केली व त्यातून जमीन पोषणाची सामुग्री निर्माण केली. चंद्रपूरचे गोंड राज्य सर्वात अधिक भरभराटीस आले. या घराण्यात तेवीस कर्तबगार राजे होऊन गेले.

राजधानी शिरपूर :

चंद्रपूर येथील गोंड राजे प्रथम वर्धानदीच्या पश्चिम किनाऱ्यावर शिरपूर येथे राज्य करीत होते. शिरपूर ही त्यांची पहिली राजधानी होती.

1) **भिका उर्फ भिमबल्लाड सिंह :**

भिका हा चंद्रपूरच्या गोंड राजवटीचा मुळ पुरूष होय. भिमबल्लाडसिंहाने (1247–1272) सर्व गोंडाना एकत्रीत करून शिरपूर (जि. आदिलाबाद, आंधप्रदेश) येथे राज्य स्थापन केले. शिरपुरच्या जवळच माणिकगड–गडचांदूर येथे एक प्रसिध्द किल्ला आहे. त्याच्या आश्रयाने त्याने ही राजधानी स्थापन केली.

2) **खरजा उर्फ खुर्जा बल्लाळसिंह :**

भिमबल्लाळसिहानंतर त्याचा मुलगा खुर्जा बल्लाळसिंह (1272–1297) राजगादीवर आला. त्याने गोंड लोकांना संघटित करण्याचा प्रयत्न केला.[5]

3) **हिरसिंह :**

हिरसिंह (1297–1322) हा खुर्जा बल्लाळसिंहानंतर गादीवर आला. हा राजनितीकुशल व युध्दकलेत निपून होता. त्याने गोंडांना शेती करण्यास व बागायती करण्यास प्रोत्साहन दिले. जमिन महसूल वसूल करण्याची पध्दत सुरू केली. त्यामुळे गोंड जमातीची व गोंड राज्याची आर्थिक स्थिती सुदृढ झाली.

- **राजधानी बल्लाळपूर :**

4) **आदिया बल्लाळसिंह :–**

हिरसिंहानंतर आदिया बल्लाळसिंह (1322–1347) राजा बनला. यावेळी यादवांचे साम्राज्य व खिलजी साम्राज्य डळमळीत होते. तुघलक काळातील अराजकतेचा फायदा घेऊन माहुरपर्यंतचा भाग त्याने अधिपत्याखाली आणला. त्यामुळे प्रशासनाच्या सोईच्या दृष्टीने वर्धा नदीच्या पूर्व तीरावर शिरपूरवरून राजधानी आणून बल्लाळपूर असे नाव ठेवले. सुरक्षिततेसाठी किल्ला बांधला.[6]

5) **तलवार सिंह :–**

तलवार सिंहाच्या काळात (1347–1372) गुलबर्ग्याचा बहामणी सुलतान अल्लाउद्दीन बहमनशाहने (1347–1358) चंद्रपूर राज्याच्या अधिनस्थ असलेल्या माहुरवर स्वारी केली. तेव्हा तलवारसिंहाने बहमनशहास खंडणी देऊन माहुरचा प्रदेश सुरक्षित केला.

6) **केसरीसिंह उर्फ केसरसिंह :–**

केसरीसिंहाने (1372–1397) चांदा राज्यातील बंड शांत करून बऱ्याच सुधारणा केल्या. त्याने राज्यात स्थिरता, शांतता निर्माण करून आपल्या राज्याची सीमा माहुर–कळंबपर्यंत पसरविली. यावेळी चांदा राज्याच्या सीमा बहामणी साम्राज्यास जाऊन भिडल्यामुळे संघर्ष अटळ ठरला.

7) **दिनकर सिंह :–**

दिनकरशाहानेही (1397–1422) सुधारणा पुढे चालू ठेवून बाहेरील कर्ते पुरूष आणि विद्वान लोक राज्यात आणले. त्यामुळे राज्यात सुव्यवस्था स्थापन होऊन उत्पन्नात वाढ झाली. त्याच्या समृध्दीमूळे त्याच्याकडे पारस असावा अशी लोक समजूत होती. चांदा राज्याच्या समृध्दीमुळे बहामनी सुलतान फिरोजशहाने (1397–1422) इ.स. 1412 मध्ये माहुरवर स्वारी केली. दिनकरशाहाने खंडणी देण्याचे मान्य करून सुलतानाचे मांडलिकत्व स्विकारले.[7]

8) **रामसिंह :–**

दिनकरसिंहाचा मुलगा रामसिंह (1422–1447) हा देखील शुर व प्रामाणिक राजा होता. त्याने जमीनदारांकडून कर वसूल करून सैन्यांना वेतन म्हणून जमीनी दिल्या. त्याने राज्याचा विस्तार

करून ताडवेल, वज्रदेही सैन्यांची निर्मिती केली. यावेळी बहामनी सुलतान अहमदशाहाने 1426, 2427, 1428 मध्ये तिनदा माहुरकर स्वारी केली. माहुर ताब्यात घेऊन कळंब येथील हिऱ्याची खान ताब्यात घेतली. त्यानंतर त्याने मुहम्मदखानास माहुरचा सुभेदार नेमले.[8]

9) **सुरजा बल्लाळसिंह उर्फ शेरशाहा :–**

सुरजा बल्लाळसिंह देखील (1447–1472) शुर होत्या. त्याने उत्तर हिंदुस्थानात जाऊन नवीन युध्दकला व नवीन राजकारण शिकण्याकरिता काही दिवस मोगल दरबारात घालविले. त्याच्या पराक्रमामुळे बादशाहाने (बहलोल लोदी) सुरजाचा सन्मान शेरशाहा ही पदवी बहाल करून मंडल्यापासून संपूर्ण गोंडवनाची सनद दिली.[9] तेव्हा पासूनच चांदयाचे गोंड राजांनी आपल्या नावामागे सिंह ऐवजी शाहा हे नाव सुरू केले. तसेच हत्तीवर आरूढ असलेला सिंह हे शौर्याचे प्रतिक म्हणून स्विकारले. बादशहाने सुरजा बल्लाळसिहास विनायकराव औरंगाबादकरांच्या माहितीनुसार साडे बावन परगण्याचे राज्य दिले.[10]

- **राजधानी चंद्रपूर :–**

10) **खांडक्या बल्लाळशाहा :–**

सुरजानंतर खांडक्या बल्लाळशाहा (1472–1497) गादीवर बसला. त्याच्या शरीरावर कृष्ठरोगाचे चिन्ह दिसत होते. त्याची राणी हिरातानी उर्फ हितारानी बुध्दीमान, सद्गूणी होती. तीने राजास मोकळया हवेत फिरण्यास प्रोत्साहित केले. त्यास शिकारीचा छंद होता. त्याने बल्लाळपूरपासून 10 कि. मी. अंतरावर जुनोना येथे एक महाल व तलाव बांधला. एक दिवस त्यास शिकार मिळाली नाही. तो तहानेने व्याकुळ झाला. झरपट नदी सुकलेली होती. परंतु नदीच्या किनाऱ्यात एका कुंडात पाणी होते. तेथील पाणी पिल्याने व तोंड धुतल्यामुळे त्याच्या आरोग्यास लाभ मिळाला. त्या आनंदात त्याने तेथे अंचलेश्वर मंदिराची स्थापना केली. तो नियमितपणे देवदर्शनास येऊ लागला. तिथेच त्याने सश्यास शिकारी कुत्र्यांवर हल्ला करतांना बघितले. या जागेस त्याने अजिंक्य समजून तिथे (चंद्रपूर) किल्ला बांधण्याचा निश्चय केला. परकोटाचे कामास प्रारंभ करून चंद्रपूर शहर बसविले. हा बल्लारपूर राजधानीतील शेवटचा राजा असून त्यानंतर गोंड साम्राज्याचे शासन चंद्रपूर शहरातून सुरू झाले.

इ. स. 1412 पासून बल्लारपूरचे राज्य बहामनीचे मांडलिक होते. जेव्हा दिल्लीच्या सुलतानाने (बहलोल लोदी) सुरजास साडे बावन परगण्याची सनद व शेरशाहा ही उपाधी दिल्यापासून चांदयाने बहामणीचे अधिपत्य नाकारून खंडणी देणे बंद केले. यावेळी चांदा राज्याच्या विस्तारात व समृध्दीत वाढ झाली होती. वैरागडची हिऱ्याची खाण व माहुर–कळंबचा भाग घेण्याकरिता बहामनी सुलतान तृतीय महम्मदशाहाने (1463–1483) स्वारी केली.[11] युसूफ आदिलखानाने वैरागडचा किल्ला ताब्यात घेऊन मुस्लिम किल्लेदाराची नेमणूक केली. पुढे खांडक्या बल्लाळशहाने सैन्य पाठवून अधिकाऱ्यास व सैन्यास हाकलून किल्ला ताब्यात घेतला.[12] त्याने चांदयाच्या किल्याचे बांधकाम तेल ठाकूर नावाच्या वास्तू शास्त्रज्ञाकडे सोपविले. राजधानी स्थलांतरीत केली. महालाची सोय नसल्याने तो बल्लाळपूराहून चांदयास जाणे–येणे करित होता. हीच गोंड साम्राज्याची तिसरी राजधानी होय.

- **चंद्रपूर राजधानीतील गोंड राजे :–**

11) **हिरशाहा :–**

खांडक्या बल्लाळशाहाच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा हिरशाहा (1497–1522) राजा बनला. 1490 मध्ये बहामनी साम्राज्याचा ऱ्हास झाल्यामुळे त्यास आपल्या राज्याचा विकास करण्याची संधी मिळाली. त्याने चंद्रपूरच्या परकोटाचे काम पुर्ण केले आणि शहराच्या चार महाद्वारांची निर्मिती केली. तसेच पाच लहान द्वारांची निर्मिती केली. त्यावर गजारूढ सिंहाची राजमुद्रा कोरली. तसेच चांदयास राजवाडा बांधून त्याच्याभोवती पाच कोटांचा किल्ला बनविला. किल्याच्या उत्तरेला लाल दरवाजा व

किल्याचा आत एक तलाव (कोनेरी) बांधला. त्याने महसूल सुधारणा केल्या.[13] त्याने नवीन जमीनदार तयार करून शेतीस प्रोत्साहन दिले. त्याच्या प्रयत्नामुळेच चंद्रपूर राज्यात एकूण सतरा मुख्य जमिनदाऱ्या व तीन उपजमीनदाऱ्या निर्माण झाल्या.[14] अहेरी व दुधमाळा जमीनदाऱ्या प्रमुख होत्या जमीनदारांचे हक्क हे हिरशाहाच्या मर्जीवर अवलंबून असे. तसेच त्याने शेती उपयोगी तलावाकरीता जमिनी इनाम दिल्या होत्या. हिरशाहाने प्रजा, शेती व शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण केले. त्यामुळे चांदा राज्याची प्रगती होऊन चांदयाच्या समृध्दीत वाढ झाली.

12) **अकबा आणि लोकबा :–**

हिरशाहा निपूत्रिक असल्यामुळे त्याची पत्नी राणी हिराईने (1522–1547) आत्राम घराण्यातील अकबा व लोकबा या दोन मुलांना दत्तक घेऊन ते सज्ञान होईपर्यंत राज्यकारभार केला. प्रारंभी लोकबास दत्तक घेतले. परंतु तो अल्पवयातच मरण पावला. त्यानंतर अकबास दत्तक घेतले. सर्व जमीनदार आणि सरदारांना राजधानीमध्ये संमेलन करण्याची हिरशाहाने सुरू केलेली प्रथा हिराईने पूर्ववत सुरू केली. राणी हिराईचा काळ धार्मिक व्यवस्थेकरीता प्रसिध्द आहे. तीने महाकाली, एकविरा तसेच अंचलेश्वर मंदीर बांधले. चंदनखेडा येथे किल्ला बांधला. जुनोना किल्याचा पाया भरून दीड मिटरपर्यंतच्या भिंती उभ्या केल्या.[15] तीच्या काळात धर्म, व्यापार आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीस प्रोत्साहन मिळाले.

13) **कर्णशाहा उर्फ कोंडीशाहा :–**

लोकबा, अकबा, राणी हिराईनंतर अकबाचा मुलगा कर्णशाहा (1547–1572) राजा बनला. त्याच्या शासनकाळात चांद्याचे राज्य दुर्बल झाल्याचे समजून रतनपुरच्या कल्याणशाहाने चंद्रपूरवर स्वारी केली. तेव्हा कर्णशाहाने तात्पुरता समझोता करून नामधारी मांडलीकत्व पत्करले. परंतु लवकरच तो स्वतंत्र झाला. कर्णशाहाने आपले राज्य उत्तरेस उमरेड, पवनी, चिचगडपर्यंत पसरविले. तो धर्मपरायण, न्यायप्रिय आणि प्रजाहितदक्ष राजा होता. त्याने बाबुपेठ वस्ती वसविली. चांदा व इतरत्र शिवमंदिरे बांधली. जुन्या मंदिराचा व गुहांचा जिर्णोद्वार केला. पठाणपूरा वार्डात जोड शिवमंदीर बांधले. बालाजी वार्डात दोन जोड शिवमंदीर आहेत. मारोडा येथे सोमनाथ मंदिर बांधले. नलेश्वर येथे शिवमंदीर बांधले. उमरेडचा किल्ला बांधला. तो न्यायप्रिय शासक होता.

14) **बाबाजी बल्लाळशाहा :–**

कर्णशाहाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा बाबाजी बल्लाळशाहा (1572–1597) चांदयाचा शासक बनला. तो वीर, महत्वाकांक्षी व स्वतंत्र्य प्रवृत्तीचा होता. त्याने बहामनीचे अधिपत्य व रतनपूरच्या हैहयवंशियांचे अधिकार अमान्य केले होते. त्याने तृतीय महम्मदशाहा बहामनीने जिंकलेला वैरागडचा किल्ला टिप्पागडचा राजा पुरमशाहाचे मदतीने परत मिळविला. पुरमशाहाच्या मृत्युनंतर टिप्पागडचा किल्लेदार म्हणून हरचंदची नियुक्ती केली. हरचंद हा धार्मिक प्रवृत्तीचा होता. त्याने वैरागड येथे भंडारेश्वर, पाताळेश्वर, बुबलेश्वर, अंचलेश्वर, राजेश्वर आणि महाबळेश्वर नावांच्या सप्तधामांची निर्मिती केली. तसेच आरमोरी येथे शिवाचे जोडमंदिर बांधले. बहामनी सुलतानाकडून कळंब सरकारातील आठ परगने परत मिळविले. हा अकबराच्या समकालीन होता. 1597 मध्ये अकबराने अहमदनगरचा पराभव केला. तेव्हा चांद्याचे राज्य मोगल साम्राज्याचे भाग बनले होते. खंडणी घेऊन चांद्याचे राज्य बाबाजीकडेच कायम ठेवले.

15) **धुंडया रामशाहा :–**

बाबाजी बल्लाळशाहाच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा धुंडया रामशाहा (1597–1622) चांद्याचा राजा बनला. त्याने आपल्या काळात चंद्रपूरच्या परकोटाचे काम पूर्ण केले. याच्याच काळात मोगलांनी

वऱ्हाड काबीज केले व धुंडया रामशाहास आपले सामंत बनविले. रामशाहास अकबराच्या काळात मोगलांचे मांडलिकत्व स्विकारावे लागले. त्याने शेतीस प्रोत्साहन देण्याकरीता ब्राम्हण आणि वीरशैव लिंगायतांना जमिनी इनाम दिल्या. त्याच्याच काळात रायप्पा कोमटी याने चंद्रपूर येथे (लालपेठ) शिवमंदीर बनविण्याचा संकल्प केला. त्याकरीता दशमुखी दुर्गा आणि अन्य मूर्ती घडविल्या.

16) **किबा उर्फ कृष्णशाहा :–**

रामशाहाच्या आकस्मिक निधनामुळे चांदा राज्यावर मोठे संकट आले. त्याचा मुलगा कृष्णशाहास (1622–1640) मोगलांकडून राजा म्हणून नियुक्त करण्यात आले. जहांगीर नंतर शहाजहान बादशाहा (1628–1658) झाला. त्याने शहाजहानचे मांडलिकत्व स्विकारून सहा लाख रूपये खंडणी आणि दरवर्षी 20 हत्ती आणि 80 हाजर रूपये देण्याचे मान्य केले. जुंझारसिंहाच्या विरोधात मोगलांना कृष्णशहाने सहकार्य केले. तसेच त्याला पकडण्यात व ठार मारण्यात मोलाची कामगिरी केली.[16] जेव्हा खानदौराननने देवगडावर स्वारी (1637) केली. तेव्हा सुध्दा कृष्णशाहाने मदत केली.[17] देवगडचा जातभाई कोकशाहास वाचविण्याचे कृष्णशाहाने बरेच प्रयत्न केले. परंतु यश आले नाही. अखेर खानदौराननने नागपूरच्या किल्याची भिंत उडविली आणि किल्लेदार देवजीस कैद केले. शेवटी कोकशाहा 16 जून 1637 रोजी खानदौरानास शरण आला. कृष्णशाहाने 18 वर्ष चांद्याचे राज्य सांभाळले आणि आजीवन मोघलांचा निष्ठावान सामंत म्हणून कामगिरी केली.

17) **बाबाजी उर्फ मानजी बल्लाळशाहा :–**

कृष्णशाहाच्या मृत्युनंतर मानजी बल्लाळशाहा (1640–1667) चांद्याचा शासक बनला. गादीवर बसताच त्याने दख्खनचा सुभेदार औरंगजेबाची भेट घेतली. आणि त्यास चार लाख रूपये खंडणी म्हणून नजराणा दिला. 1640–44 च्या दरम्यान चांदा राज्यात दुष्काळ पडला होता. तेव्हा औरंगजेबाने 1655 मध्ये चांदा राज्याचा चालू कर आणि थकीत खंडणी माफ केली. याच्या कार्यकाळात शेतजमिनीचे मोजमाप करून भूमापन अभिलेख तयार करण्यात आले. ज्या गावात मुकदम नव्हते त्या गावात मुकदमाची नेमणूक करण्यात आली. त्यामुळे शेतकऱ्यांवरील अन्याय दूर होऊन राज्याचा महसूल वाढण्यास मदत झाली. गरीब शेतकऱ्यांना बीजाई, अवजारांचा पुरवठा केला. तकाबी कर्जाची व्यवस्था केली. त्यामुळे चंद्रपूर राज्याचे उत्पन्न वाढले.[18]

1657 मध्ये औरगंजेबाने शाईस्तेखानास शिवाजीविरूध्द पाठविले होते, तेव्हा चंद्रपूरच्या राजास शाईस्तेखानाच्या मदतीकरिता पाठविण्यात आले. परंतु शाईस्तेखान यशस्वी झाला नाही. त्यानंतर जयसिंहास पाठविले, त्यावेळेही मानजी बल्लाळशाहा व त्याच्या मुलास मोगल सैन्यात भरती होण्याचे आदेश होते. परंतु मानजी हा जयसिंहाच्या निरोपानंतर सुध्दा मोगल सैन्यात सामील झाला नाही. यावरून तो स्वराज्यप्रेमी होता हे स्पष्ट होते. मानजीच्या वरील धोरणामुळे मोगलांना शंका आली. म्हणून औरगंजेबाने मानजीचा बदला घेण्यासाठी दिलेरखानास (1667) पाठविले. वऱ्हाडचा सुभेदार इरिजखान यास अचलपूरहून, बिकानेरचा राजा रावकर्ण तसेच छत्रसाल बुंदेला यांना यवतमाळकडे रवाना केले. दिलेरखानाने माणिकगड किल्ला जिंकला. त्यानंतर चंद्रपूरवर आक्रमण केले. चंद्रपूरातील राजवाडयाची नासधूस केली. तेव्हा मानजी भयभित झाला. त्यामुळे मानजीने मुलगा रामसिंहासोबत माढेळी येथे दिलेरखानाची भेट घेतली. पाच लाख रूपये लाच आणि बादशाहास एक करोड रूपये दंड आणि वार्षिक खंडणी देण्याचे मान्य केले. परंतु दिलेरखानास विश्वास नव्हता. मानजीने 77 हजार रूपये अग्रीम भरले आणि उर्वरीत रकमेकरीता जेष्ठ मुलगा मधुकरशाहास पवनारचा सुभेदार कादरदादखानाकडे जमानत ठेवले. आठ लाख भरल्यावर मधुकरशाहाची सुटका

झाली. मानजी हया अपमानामुळे आणि आर्थिक नुकसानीमुळे दुःखी झाला. अशा स्थितीत एका राजपूत सैनिकाने खाजगी कारणाने 1667 मध्ये मानजीची हत्या केली.

18) **रामसिंह :–**

मानजीनंतर त्याचा अल्पवयस्क मुलगा रामसिंग (1667–1684) चंद्रपूरचा शासक बनला. तो वयस्क होईपर्यंत मानजीचा जेष्ठ पुत्र मधुकरशाहाने गादी सांभाळली. कदाचित मधुकरशाहा दासीपुत्र असावा. 1681 मध्ये रामसिंग वयस्क झाल्यावर 30 नोव्हेंबर 1681 रोजी तयाने औरंगजेबाची भेट घेतली. औरंगजेबाने 1 जानेवारी 1682 रोजी त्यास मानाची वस्त्रे, सोनेरी सजविलेला घोडा, एक हत्ती व रत्नजडीत सिरपेच देऊन सन्मानपूर्वक निरोप दिला.[19] चांद्याचे गोंड राजे मोगलांकडे असणे छत्रपती शिवाजींच्या साम्राज्य हिताचे नव्हते. म्हणून त्याने 1673 मध्ये चंद्रपूरवर आक्रमण केले. परंतु मोगलांपूढे त्यांचा टिकाव लागला नाही. शिवाजीनंतर संभाजीने 1682 मध्ये चंद्रपूरवर आक्रमण केले. यावेळी रामसिंग मोगल शिबिरात होता. परंतु स्थानिक सैन्यांनी प्रतिकार केला. रामसिंगाच्या काळातच औरंगजेब पुत्र अकबराने बंड केले होते. त्यास पकडण्याची जबाबदारी औरंगजेबाने रामसिंगावर सोपविली होती. परंतु या दरम्यान रामसिंगावर मोठे संकट आले. किसनसिंह उर्फ त्रिवरसिंहाने औरंगजेबास खुष करून चंद्रपूरची गादी बळकावली. आक्टोंबर 1683 मध्ये रामसिंगास विद्रोह करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यात त्याला यश आले नाही. अखेर दोनशे सैनिकांसह तो पळून गेला. पुन्हा त्याने चांद्याच्या राजवाडयात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यात यश आले नाही. औरंगजेबाने 1684 मध्ये रामसिंगास चांद्याच्या राजगादीवरून बडतर्फ करून 31 डिसेंबर 1684 रोजी किसनसिंगास जमीनदार म्हणून मान्यता देऊन चांद्याच्या राजगादीवर बसविले. 19 नोव्हेंबर 1684 रोजी किसनसिंगाच्या हस्तकांनी रामसिंगास ठार केले.

19) **किसनसिंग :–**

रामसिंगानंतर किसनसिंग (1684–1696) चंद्रपूरचा शासक बनला. मराठयांचे राज्य बुडविण्याच्या मनसुब्यात किसनसिंगाने मदत केली. त्याचेकडे खजिन्याचे संरक्षण, तंबुभोवती पहारा देणे, रसद आणणाऱ्या उंच हत्तींचे संरक्षण, जनानखाण्याचे संरक्षण, हेर हुडकून आणणे इत्यादी लहानसहान कामे सोपविली होती. शहजादा मुईउद्दीनने घातलेल्या पन्हाळयाच्या वेढयात (1691–92) किसनसिंगाने बरीच कामगिरी बजावली. त्यानंतर 1694 च्या आदेशाने हमीदखानाच्या (लुत्फलल्लाखान) हाताखाली त्यास काम करण्यास सांगितले. किसनसिंग 1694 मध्ये मोगल सैन्यात दाखल झाला. तेव्हा चंद्रपूर राज्यात बंडखोरांचा उपद्रव झाला. त्यामुळे चांद्याकडे जाण्याची परवानगी मागितली. परंतु ती नाकारली आणि बादशाही कामगिरी कोणत्याही इतर कामापेक्षा श्रेष्ठ असे बजावले. दिलेली कामगिरी चोखपणे बजवावे. 1694 मध्ये मराठयांनी पन्हाळयावरून मोगलांची हकालपट्टी केली. किसनसिंगाची रजा मंजूर होताच तो चांद्यास येऊन त्याने बंडखोरांचा बंदोबस्त केला. बंडखोर रामगीर हैद्राबादला पळून गेला. त्यानंतर पुन्हा तो बादशाहाच्या सेवेत रूजु झाला. किसनसिंगास वीरसिंह व कालसिंह (कानसिंग) अशी दोन मुले होती. जमीनदारीच्या महत्वाकांक्षेपोटी आपल्या आईसोबत इस्लाम धर्म स्विकारीला. बादशाहाने त्याचे नाव नेकनामखान असे ठेवले.

20) **बिरसिंग उर्फ विरशाहा (बिरशाहा) :–**

किसनसिंगाच्या मृत्युनंतर बीरशाहा (1696–1704) सिंहासनावर बसला. त्याची शिफारस बादशाहाचा वजीर आसदखानाने केली होती. तेव्हा ऑगष्ट 1696 मध्ये त्यास दीड हजारी मनसबदारी, राजा ही पदवी, एक हत्ती, खिलतीची वस्त्रे व एक खंजीर देण्यात आले. यावेळी देवगडचा राजा बख्यबुलंदने मोगलांविरूध्द बंडखोरी केली होती. तेव्हा बादशाहाने बीरशाहास आदेश

दिले की, आपल्या भावास नेकनामखानास देवगड येथे स्थापन करून चांद्यास परत यावे.[20] तेव्हा बख्तबुलंदने बीरशाहास धडा देण्यासाठी माहूर परगण्यावर आक्रमण केले. परंतु बादशाही सैन्यांनी त्याचा बंदोबस्त केला. खंडणी वसुलीसाठी बादशाहाकडून पवनारचा फौजदार बिंद्रावन यास पाठविले. त्याप्रमाणे बीरशाहाने खंडणी भरली. परंतु बिंद्रावनने ती खजिण्यात भरली नाही. त्यामुळे त्यास पदावरून बडतर्फ केले. त्याच्या जागी अलीमर्दानखान यास पवनारचा फौजदार म्हणून नेमले. अलीमर्दान खानाने 27 एप्रिल 1701 रोजी बीरशाहाकडून पुन्हा एक लाख रूपये खंडणी वसुल केली. बीरशाहाने सुरजागडच्या प्रदेशातील साधो व मुळो नावाच्या बंडखोरांनी माजविलेला धुमाकूळ कोकशाहा शेडमाकेच्या नेतृत्वात शांत केला. त्यामुळे त्यास सुरजागडची जमीनदारी दिली. त्याचे मुख्यालय अहेरी होते. तो अहेरी जमीनदारीचा संस्थापक बनला.

बीरशाहाचा जावई दुर्गशाहाने बीरशाहाच्या मुलीचा अपमान केला तेव्हा त्याचा सुड घेण्यासाठी बीरशाहाने त्यास ठार मारून त्याचे शिर महाकालीस अर्पन केले, असे कथानक आहे. तसेच बीरशाहास संतती नव्हती म्हणून त्याने दुसरे लग्न करण्याचे ठरविले. हयामुळे त्याची पत्नी राणी हिराई उर्फ गंगाबाई च्या अंगरक्षक हिरामनने बीरशाहास ठार केले. नेकनाम खानाने बीरशाहास ठार मारले असेही म्हटले जाते. बीरशाहाच्या मृत्युनंतर चंद्रपूर राज्याची विनाशाकडे वाटचाल सुरू झाली.

21) **राणी गंगाबाई उर्फ हिराई :–**

बीरशाहाच्या मृत्युनंतर त्याची पत्नी राणी गंगाबाई उर्फ राणी हिराईने (1704–1719) चंदनखेडा येथील दिराचा (गोविंदशाहा) तीन वर्षाच्या रामशाहास दत्तक घेतले. राणी गंगाबाईने दिवाण बापूजी वैद्याच्या मदतीने तो सज्ञान होईपर्यंत राज्यकारभार केला. तीने महाकाली मंदीराचा जिर्णोध्दार आणि बीरशाहाच्या समाधीचे बांधकाम केले. राजमाता गंगाबाईची कारकिर्द महत्वपूर्ण हयासाठी आहे की, तिने महाकाली, अंचलेश्वर आणि गणपती मंदीराचा जिर्णोध्दार केला. तसेच गोवध बंदी लागू करून पुष्कळ दानधर्म केला. मंदीरांना उत्पन्ने लावून दिली. सुखावह प्रजा, शिक्षण, संस्कृतीकरिता तिची कारकिर्द महत्वपूर्ण ठरली. रामशाहा सज्ञान होईपर्यंत म्हणजेच 1704 ते 1719 पर्यंत तीने राज्यकारभार केला.

राणी गंगाबाईच्या काळात 1707 मध्ये नेकनामखानाने चांद्यावर स्वारी केली. तसेच 1710–11, 1714, 1715, 1718 मध्ये मराठयांनीही चांद्यावर स्वारी केली. तरी देखील राणी गंगाबाईने न डगमगता त्यांचा प्रतिकार केला. राणी गंगाबाईच्या काळापासूनच चंद्रपूर राज्यावर मराठयांची जोरदार आक्रमणे सुरू झाली.

22) **रामशाहा :–**

रामशाहा (1719–1735) सज्ञान झाल्यावर त्याने राज्यकारभार आपल्या हाती घेतला. रामशाहाने स्वतःचा शिक्का बादशाहाकडून मंजूर करून घेतला. कान्होजी भोसल्याने रामशाहाच्या काळात चंद्रपूरवर (1724) स्वारी केली. परंतु गोंड, जाट, पठाण सैन्याच्या मदतीने कान्होजीचा प्रतिकार केला. रामबागेजवळ मोठी लढाई होऊन त्यात कान्होजीचा पराभव झाला. त्यास वर्धेपार हाकलून देण्यात यशस्वी झाले. तसेच निजामाने पालखेड मोहिमेच्या नुकसानभरपाईसाठी चांदा राज्यावर आक्रमण केले. तेव्हा रामशाहाने भयभित होऊन माणिकदुर्ग, शिरपूर, वीरशाहापेठ, पाटणबोरी, जुनगाव, तुरूकचांदा, उटणूर, सिरकुंडा, कवालकायेर, राळेगाव, वेठाभादी आणि वडुरपेठचे महाल व किल्ले निजामास सोपविले.[21] यावेळी रघुजीने कान्होजीचा बंदोबस्त करून त्याला साताऱ्यास पाठविले.

त्यावेळी रघुजी व रामशाहाची महाकाली पटांगणात भेट झाली. शिष्टाचारपूर्वक एकमेकांचे स्वागत केले. रामशाहाच्या पवित्र आचरणाचा व साधुवृत्तीचा परिणाम रघुजीवर झाला आणि रघुजीने त्यास वस्त्रालंकार देऊन सन्मान केला व खंडणी घेऊन परत केला. रामशाहाने मराठा राज्याची मांडलिक स्थिती मान्य केली. गडबोरी परगण्यात झालेले बंड सेमाजी ढुमे यांनी मोडल्याने त्यास गडबोरी परगण्यातील 209 गावांच्या देशपांडेपणाची सनद आणि नवरगाव व चारगांव मोकासा म्हणून दिले. यावरून रामशाहाची गुणग्राहकता लक्षात येते.

23) **निलकंठशाहा :–**

रामशाहानंतर चंद्रपूर राज्याचा शेवटचा गोंड राजा निलकंठशाहा (1735–1751) गादीवर बसला. प्रारंभी त्याने चांगल्या प्रकारे राज्यकारभार केला. परंतु त्यास नंतर अनेक व्यसने जडली. त्याचा स्वभाव तापट व क्रुर झाला. तो प्रजेस व दिवाणास त्रास देऊ लागला. त्याचे बोकारे सावकाराशी घनिष्ट सबंध होते. त्याच्याच शिफारशीवरून सेमाजी उर्फ शंकर दुम्याचा मुलगा नारायण यास शिरपूर–वणी परगण्यातील 198 गावाचे सरमुकादम आणि भद्रावती व वरोडा परगण्यातील 141 गावांची देशमुखी 1743 मध्ये दिली. तसेच त्याने अनेक ब्राम्हणांना आश्रय दिला. निलकंठशाहा तापट व लहरी असल्यामुळेच त्याने शिरपूर (वणी) चा मोकसदार कन्नाके बंधू राघबा, आगबा, बागबा यांना अनुक्रमे घुग्गूस, वरोडा येथील लढाईत ठार मारले. बागबाने शिरपूर येथील गुहेत आत्महत्या केली. त्यामुळे निलकंठशाहाची प्रतिमा जनमानसामध्ये मलीन झाली. निलकंठशाहाच्या काळात खरी सत्ता त्याचा दासीपुत्र गणेश ठाकुर याचेकडे होती. त्याने तिमाजी सखदेवसारख्या मुरब्बी दिवाणास पदावरून काढले. याचवेळी महादेव वैद्यसारखा कर्ता पुरूष पठाणांकडून मारल्या गेला. म्हणून रघुजी भोसल्यांनी महादेव केशव यास चंद्रपूरचा सुभेदार नेमले. तसेच शिवाजीपंत केशव टाळकुटे यास 4000 सैनिकांसह शांतता व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी नियुक्त केले. चांद्याचा किल्लेदार म्हणून रहिमदादखान यास ठेवून त्यास भांदकची जागीर दिली.[22]

5 जून 1749 रोजी रघुजीने मराठयांचा चंद्रपूरवरील हिस्सा दोन तृतीयांस करून जवळजवळ निलकंठशाहास निवृत्तच केले.[23] परंतु 1750 मध्ये चंद्रपूरमध्ये पठाण, गोंड, खंडाईत या असंतुष्ट लोकांनी बंडखोरी केली. रघुजी पुणे येथे असल्यामुळे बंडखोरांचा बिमोड लगेच करता आला नाही. परंतु सप्टेंबर 1750 मध्ये रघुजीने पुर्ण ताकदीनिशी चंद्रपूरला वेढा दिला आणि त्यात त्याला पूर्णपणे यश आले. रघुजीने निलकंठशाहास कैद केले. 1 जानेवारी 1751 रोजी भोसल्यांनी चंद्रपूरवर पूर्णतः विजय मिळविला आणि किल्यासहीत संपूर्ण प्रदेश, चंद्रपूर राज्य खालसा केले. चंद्रपूर राज्याच्या व्यवस्थेकरिता कृष्णाजी नारायण कऱ्हाडे याची नियुक्ती केली. निलकंठशाहास बल्लाळपूरच्या किल्यात नजरकैदेत ठेवले. अशाप्रकारे अपमानीत जीवन जगतांना 1765 मध्ये बल्लाळपूरच्या कैदतेच त्याचा मृत्यु झाला.

- **निष्कर्ष :–**

अशाप्रकारे 1247 ते 1751 पर्यंत एकूण 504 वर्षाच्या कालखंडात एकूण तेवीस गोंड शासकांनी अनुक्रमे शिरपूर, बल्लाळपूर व चांदा या तीन राजधान्यामधून राज्यकारभार केला. गोंड शासकांनी विविध योजना अंमलात आणून चंद्रपूर राज्याचा विकास केला. कृषीचा विकास केला. अनेक वास्तू निर्माण करून सांस्कृतिक विकास साधला. या गोंड शासकांनी मोगलांचे मांडलिक म्हणूनच कारभार केला. रामशाहाने ज्या चुका केल्या त्या सुधारल्याशिवाय शेवटचा गोंड राजा निलकंठशाहाने त्याचा कित्ता गिरविला. त्याचे परिणाम पूर्वीपेक्षाही गंभीर झाले आणि चंद्रपूरचे राज्यच समाप्त झाले. चंद्रपूर राज्यावर मराठयांचा अधिकार स्थापित झाल्यावर निलकंठशाहा साहजिकच असंतुष्ट झाला. परंतु

रघुजीपुढे त्याचा टिकाव लागला नाही. 1751 मध्ये रघुजीने चंद्रपूरवर स्वारी करून भोसल्यांची सत्ता स्थापित केली. नागपूर राज्यांतर्गत नवीन सुभा तयार केला. 1854 पर्यंत नागपूरचे राज्य खालसा होईपर्यंत चांद्यावर भोसल्यांची राजवट होती. 1854 मध्ये चांद्याचे राज्य खालसा करून ब्रिटीशांनी आपली सत्ता निर्माण केली.

- **संदर्भ सूची :–**

1) अंधारे भा. रा., देवगडचे गोंड राजे, पृ. क्र. 1
2) नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटियर, 2005, पृ. क्र. 133
3) गद्रे प्रभाकर, मध्ययुगीन चंद्रपूर पृ. क्र. 10
4) राजुरकर अ. ज., चंद्रपूरचा इतिहास, 1982, पृ. क्र. 106
5) मेजर लुसी स्मिथ, चांदा सेटलमेंट रिपोर्ट, 1869, पृ. क्र. 69
6) राजुरकर अ. ज., चंद्रपूरचा इतिहास, 1982, पृ. क्र. 114–115
7) मेजर लुसी स्मिथ, चांदा सेटलमेंट रिपोर्ट, 1869, पृ. क्र. 62
8) काळे या. मा., नागपूरकर भोसल्यांचा इतिहास, पृ. क्र. 16
9) राजुरकर अ.ज., चंद्रपूरचा इतिहास,1982, पृ. क्र. 122
10) गद्रे प्रभाकर, मध्ययुगीन चंद्रपूर, पृ. क्र. 17
11) विल्स सी. यु., द राजगोंड महाराजाज ऑफ सातपुरा हिल्स, पृ. क्र. 40
12) नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटियर, 2005, पृ. क्र. 145
13) कित्ता, पृ. क्र. 147
14) राजुरकर अ. ज., चंद्रपूरचा इतिहास, 1982, पु. क्र. 131 ते 136
15) गद्रे प्रभाकर, मध्ययुगीन चंद्रपूर, पृ. क्र. 21
16) चांदा डिस्ट्रिक्ट गॅझेटियर, 1973 पृ. क्र. 85
17) विल्स सि. यु., द राजगोंड महाराजाज ऑफ सातपुरा हिल्स, पृ. क्र. 141
18) सरकार जदुनाथ, हिस्ट्री ऑफ औरगंजेब, खंड–5, पृ. क्र. 191,192
19) राजुरकर अ. ज., चंद्रपूरचा इतिहास, 1982, पृ. क्र. 162, 163
20) पगडी सेतु माधवराव, मोगल–मराठा संघर्ष, पृ. क्र. 122–125
21) कित्ता, स्टडीज इन मराठा हिस्ट्रि, खंड–2, पृ. क्र. 84, लेख–23, पृ. क्र. 89, लेख–27
22) काळे या. मा. (संपा.), गुप्ते बंखर, पृ. क्र. 54–55
23) गद्रे प्रभाकर, मध्ययुगीन चंद्रपूर, पृ. क्र. 38

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
with
International Impact Factor 2.254

ISSN No. 2394-8426
Dec – 2015
Issue – I, Volume – V
Online Journal

Public Sector Enterprises In India And Status Of Executive Training And Development: An Overview

Sneh Lata
Assistant Professor in Commerce
WRS Govt College,
Dehri, Kangra(H.P.)

ABSTRACT

The department of Public Enterprise acts a nodal agency for coordinating training and development of managers in public enterprises. Training efforts organized by public enterprises are supplemented by courses offered by premier management and training institutes which provide specialized training facilities that are generally not available with public enterprise. The building up of infrastructure for expansion of training facilities has been given increasing importance by the management of public enterprises. An important milestone in the development of training has been the setting up of separate training department in public enterprise to identify the training requirements, specify the object of training, and ensure lying down of goals in regard to improving necessary knowledge to keep pace with change in the external environment. Within the organization, a public enterprise must re-design its training plans and objectives, care must be taken with regard to the method of objectives, provisions of training schemes for groups with common needs, assessment of external training facilities, methods of implementation and evaluation procedures and achieving better results.

Training and Development increasingly occupies a significant position within central enterprises, as a result of the growing interest in the training and development function which increase the level of production and productivity which securing reasonable returns on the investment, keeping in view the larger interests of the public.

The research paper is based on executive training and development in Public Sector Enterprises. Hence, the Public Sector Enterprises and the status of training and development is discussed in this paper.

Keywords:

Training, Development, Executive, knowledge, Productivity.

Introduction

The Public Sector Enterprises, both at the Central level and at the State level have played a very important role in industrialization and overall economic development of the country. While the macro-economic objectives of the Public Sector Enterprises have been derived from the Industrial Policy Resolutions and Five Year Plans, the need for public utilities in the states has been the main motivation behind the establishment of State Level Public Sector Enterprises. The

State Level Public Sector Enterprises have, therefore, contributed greatly towards the development of infrastructure in the country.

Growth of Public Sector Enterprises in India

At the dawn of independence from the British Colonial rule, the Indian economy was in a shattering state and mass population of poor, illiterate and unemployed sections of the society were looking towards the national leaders of that period for building a new India, which could a provide positive hope to them in a 'real promising' way. Pundit Jawahar Lal Nehru was leading the team of other nationalist leaders and by becoming the first Prime Minister of free India; he shouldered this great responsibility of building a strong and modern India. From day one he was committed to provide social justice as well as to create a strong base for lifting the Indian economy. He was in favour of a greater role of the government in all activities of development and very soon he paved the way for creation of a large base and scope for the public sector by introducing the First Industrial Policy Resolution. There was a widespread belief that, without increasing the role of the State, it was not possible either to accelerate the process of growth or to create an industrial base for sustained economic development of the country **(Dutt, *Indian Economy*, 2009, p.226).** The draft of the **Second Five Year Plan (1956)** stated, "the adoption of the socialist pattern of the society as the national objective, as well as the need for planned and rapid development, require that all industries of basic and strategic importance, or in nature of public utility services, should be in public sector . . . . The state has, therefore, to assume direct responsibility for the future development of industries over a wider area." Although this Nehru Model of development supported a bigger role for public sector, yet, it left some scope for private sector also in smaller areas of activity and in areas of non-strategic nature. Since the adoption of first Industrial Policy Resolution in 1948, the public sector, therefore, has played a very strategic and dominant role in the development of India and the number of public sector undertakings kept on growing with more and more investment in them by the government.

Table 2.1

ISSN No. 2394-8426
Dec – 2015
Issue – I, Volume – V
Online Journal

Growth of Investment in Public Sector Enterprises

As on March 31	No. of Units	Total Investment (in Crores)
1951	5	29
1961	47	950
1980	179	18150
1990	244	99330
2001	242	274198
2007	247	421089
2008	214	763815
2009	213	793096
2010	217	908842
2011	220	603975
2012	260	729298
2013	277 (48 under construction)	850559

Source: Public Enterprises Survey 2012-13

This trend was followed with some changes and with the coming up of new industrial policies till 1991, a new era of economic reforms began in India with the introduction of the New Economic Policy in 1991, for a complete change in the Government of India's policy for public sector.

Development of Infrastructure in Public Sector Enterprises

According to Nagaraj (1991 Economic and Political Weekly p.877)

Economic Development in any underdeveloped country depends on infrastructure without sufficient doses of investment in expansion power and energy. Transportation and Communication facilities, and basic and heavy industries, the process of industrialization cannot be sustained. India had inherited an undeveloped basic infrastructure from the colonial period. After Independence, the Private Sector neither showed any inclination to develop itself nor did it has any resources to make this possible. It was comparatively shy both financially and technically and was incapable of establishing a heavy Industry immediately. This has forced the state's participation in industrialization essential, as the state could enforce a large scale mobilization of capital, the co-ordination of industrial construction and training. The Public Sector has not only improved the road, rail, air and sea transport system, but also expanded them in manifold. Thus, the Public Sector has

enabled the economy to develop a strong infrastructure for the further economic growth. At the same time, the private sector has also benefited immensely from these projects undertaken by the Public sector".

Review of Poor Performance of Public Sector Enterprises in India

Singh (Public Sector Enterprises in the Eighties, 1981) has made an exploratory study on the performance of public enterprises during the period of ten years ending in 1979-80. He has identified number of reasons for poor performance of public enterprises. These include, the long gestation period, adoption of administered price policies, managerial inefficiencies and indifferences, lack of accountability, role of politicians in policy making etc. **Bagchi** (The Role of Public Enterprises in India, 1982) had made an evaluation on the role of Public Sector Enterprises in India against the explicit and implicit objectives during the period of 1976 and 1985. He has appreciated the performance of these enterprises in respect of their efficiency in generation of employment and their contribution to the net domestic savings in India. He lamented on the non-implementation of different recommendations made by the different Committees for the betterment of efficiency of these enterprises. He also pleaded for restructuring the management styles and accountability aspects of these enterprises.

Bhatia (Researches on Profitability of Public Enterprises, 1983) has made a review that the common reason for deteriorating performance of public enterprises is the lack of commitment and lack of accountability of management at all levels.

Chattopadyay (Central Government Enterprises: An Eighteen Year Plan, 1989) has brought an evaluation work on the performance of Central Government enterprises covering a period of 18 years from 1969-70 to 1986-87. He has presented the criticism leveled against the performance of Public Sector Enterprises. He evaluated that in order to have the potential to record much better results, have to run on business lines by maximizing the rate of return on capital employed. He has put forwarded a number of suggestions to improve the working of these units, including the application of principles of sound management.

Executive Development in Public Sector Enterprises

Public Enterprises recognize human resources as their prime asset. Furthermore, in view of the fact that India is engaged in the task of bringing about

a basic transformation in its industrial and economic structure, training assumes greatest purpose and urgency, at the Central and State levels. The training goes a long way in enhancing much-needed self-confidence, authority and respect. The training becomes particularly vital for the future needs of organizations, as a paucity the of trained employees may hold up its development. The training not only paves the way for growth and development of an organization, but also goes a long way towards placing management in this country on a sound professional basis. In order to ensure the availability of properly qualified and trained personnel in the required numbers for various levels of management- technical as well as nontechnical, it is necessary to institute training progmmmes at different levels in the organization. Thus, the Executive training and development is the direct responsibility of management in all organizations. Whatever the system of recruitment, there is always a need to improve the capability of employees through training. The training improves employee's productivity and performance, and creates a favourable organizational climate.

Importance of Executive Training and Development in Public Sector Enterprises

Public Sector Enterprises have gone a long way towards development of personnel by establishing formal training departments and budgets. So, it is necessary to review the training objectives, training policies and training programmes in the light of the changing technologies and environment. Moreover, effective adoption of management development and training orientation, and the concomitant emphasis on specific development and strategy, would evolve depending upon the type of pressures the organization takes from its internal and external environment. Hence, planning (both short-term and long-term) at various levels and a coordinated effort on the part of the public enterprise management and the government would help promote management development in public enterprises. The public sector has now entered a new phase of its development/disinvestments. As such, the policies pursued in all the functional areas of the management should aim at improving the competitiveness of this sector. Professionalism in management has to be made the catalyst for economic and industrial development. So, the training of employees in Public Sector

Enterprises has two objectives: getting the necessary number of employees' requisite qualifications, and enhancing the skills of personnel already in service. Training and development of personnel is not a choice of top management, it is a necessary requirement of the socio-economic system, organizational growth, changing technology, and the changing competitive environment. Today, the planned development of executives as well as workers and administrative staff at lower levels is one of the main tasks of any public enterprise to ensure its very survival. The top management of the enterprise should extend full support and participation in the training programmes designed by their organizations. It is the Top management responsibility to see that the organizations' climate is conducive to training. By showing interest in long range planning, the progress of training and development of sound plans and procedures, the top management can play a big role in cost-effective training.

Thrust Areas for Training in Public Sector Enterprises

The following are the thrust areas for imparting training to the employees/officers.

(i) Information Technology: The training programmes should contain significant inputs on IT application / e-governance for all categories of employees.

(ii) Service Delivery: The emphasis in such courses should be on the quality service delivery within prescribed time period.

(iii) Project Monitoring and Management: Frequent training in Project Monitoring and Management to avoid costs and time over runs in implementing the projects. It will be useful for Class-I Officers.

(iv) Office Procedures and Rules, for all officers and officials.

(v) Ethics and Values: Training programme emphasis to be on ethics and value based administration and all emergent issues in the society. This type of training is required for all level of officers & officials.

2) साधनसंपत्तीचा वापर :– ज्या देशात विपुल नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध आहे अश्या भागात उदयोगांची संख्याजास्त असुन देशात नविन उदयोग निर्माण होत असतात.तसेच या नविन उदयोगामुळे देशाचा आर्थिक विकासाला वेग मिळतो.

3) विकास प्रक्रियेला चालना :– उदयोगधंद्यामुळे देशाच्या विकास प्रक्रियेला चालना मिळते देशात निरनिराळया वस्तु सेवांचे उत्पादन वाढविण्यासाठी उद्योगधंदयाचा विकास आवष्यक असतो. या विकासातुन देशाच्या आर्थिक प्रगतीचे चित्र निर्माण करणे शक्य होते.

4) राष्ट्रीय उत्पन्नात वाढ :– राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून देशाच्या आर्थिक विकासाची कल्पना येते राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाल्यास दरडोई उत्पन्न वाढते.

5) समतोल आर्थिक विकास :– देशातील संपुर्ण भागात कमी जास्त प्रमाणात उदयोगांची निर्मिती केल्यामुळे संपूर्ण देषात उदयोग निर्माण होईल देशातील सर्व भागातील लोकांना रोजगार मिळेल व साधनसंपतीचे पूरेपूर वापर होऊन देशाचा समतोल आर्थिक विकास घडुन येईल.

6) निर्यातीत वाढ :–उद्योगधंदे व विदेशी व्यापार यामध्ये निकटचा संबध आहे उद्योगधंद्यामुळे विदेशी व्यापार यामध्ये वाढुन आर्थिक विकासाला चालना मिळेल. देशाचा वेगाणे विकास होण्यास सुरूवात होते.

7) रोजगार निर्मिती :– भारतासारख्या अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या देशात जलद विकास होण्याकरीता उदयोगांचा विकास होणे आवश्यक असते. उद्योगांचा विकासामुळे देशातील जनतेला रोजगार मिळेल.त्यांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारेल व देशाचा आर्थिक विकास होईल.

8) दारीद्रय निर्मुलन :– भारतात असंख्य लोक आजही दारीद्रय रेषेखाली जिवण जगत आहे.देशातील अनेक जनता शेतीवर अवलंबुन आहे. भारतात जलद आर्थिक विकास साध्य होण्याकरीता देशातील उदयोगांचा विकास घडुन येणे आवश्यक आहे.

9) स्वयंपूर्णता व स्वालंबन :– जागतीकीकरणाचा या युगात कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था स्वावलंबी व स्वतंत्र असु शकत नाही. प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था ही जागतीक अर्थव्यवस्थेचा एक घटक असते.विदेषी

वस्तुंवर अवलंबुन राहुन देषातील उदयोगांचा विकास व आर्थिक विकास कधीच साध्य होत नाही याकरीता देशाला स्वयंपुर्णता व स्वालंबन होणे आवश्यक असते.

10) लोकसंख्यावाढीला नियंत्रण :–

देशात उद्योगांचा विकासाबरोबरच शिक्षणाचा विकास,राहणीमाणाचा,दर्जाचा विकास,सांस्कृतिक प्रगती, स्त्रियांना समान दर्जा,विभक्त कुंटुब पध्दती आरोग्य सुविधांचा विकास होऊ लागतो. त्यामुळे देशातील लोकसंख्या वाढ या भिषन प्रश्नावर तोडगा काडणे शक्य होते. तसेच यातुन देशाचा आर्थिक विकास वेगाने घडवुण आणने शक्य होते.

याशिवाय इतरही अनेक कारणांमुळे उद्योगधंदे महत्त्वाचे ठरतात. उद्योगधंद्याच्या विकासाद्वारे राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई वाढविता येते. औद्योगिक विकासामुळे देशाचा विकास जलद गतीने होते. नवनविन उद्योग नव्याने सुरु होण्यास मदत मिळते.

शारांश

आर्थिक विकास साधण्याकरिता आर्थिक घटकांमध्ये गती मिळणे आवश्यक असते. देशात विकास घडवून आणन्याकरिता भांडवलाची आवश्यकता असते. हे या भांडवलाचा जोरावर नवनविन उद्योगांची निर्मिती देशात होत असते नविन उद्योग लागल्यामुळे देशात नवनविन वस्तू खेरदी करण्याकरिता ग्राहक तयार असतो. याद्वारे अनेक उद्योग निर्माण होतात. या स्थितीत नवनविन रोजगार उत्पन्न होतात. हळुहळु देशाच्या विकास होण्यास सुरुवात होते.

भांडवल आणि आधुनिक तंत्रज्ञान हे औद्योगिकीकरणाचे प्रमुख निर्धारक घटक आहे. नव्या तंत्राचा अवलंब करुन उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यात भांडवलाची अधिक मात्रा वापरली जाते. त्यामुळे जलद उद्योगांची निर्मिती होउ लागते व आर्थिक विकास घडायला सुरुवात होते.

सदर्भ सुची

1. प्रा. रायखेलकर ए. आर. आणि डॉ. दामजी बी.एच 'औद्योगिक अर्थशास्त्र' शशिकांत पिंपळापूरे, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगपूरा. औरंगाबाद – जुन 2005 पुष्ठ क्र. 01 ते 05
2. प्रा. इंदुरकर ' भातरीय अर्थव्यवस्था ' विद्या प्रकाशन, रुईकर पथ महाल, नागपूर
3. औद्योगिक निती 2005, भारत सरकार नवी दिल्ली.
4. en.wikipedia.org/wikk./industry
5. प्रा. खांडवे म. अ., 'औद्योगिक भुगोल, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, विजयनगर , पूणे.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
with
International Impact Factor 2.254

ISSN No. 2394-8426
Dec – 2015
Issue – I, Volume – V
Online Journal

विपणन पर्यावरण–एक जटिल समस्या

प्रा.राजेश सुधाकर डोंगरे
गुरूकुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदा

गोषवारा :–

व्यवहारामध्ये पर्यावरण म्हणजे निसर्ग किंवा नैसर्गीक घटक असा मर्यादित अर्थ घेतला जातो. वस्तुत: पर्यावरणही एक व्यापक संकल्पना आहे. सभोवतालच्या परिस्थितीचा व घटकांचा एकत्रित संच म्हणजे पर्यावरण होय. आपल्या सभोवती अनेक घटक आढळतात. हे सर्व घटक कधी स्थिर असतात. तर कधी बदलते असतात. व्यवहारातील सर्व बाबींवर या घटकाचा काहीना–काही प्रमाणात परिणाम होतच असतो. विपणन पर्यावरण ही संज्ञा विपणन कार्यावर प्रभाव टाकणा–या घटकांशी संबंधीत आहे. वस्तुत: पर्यावरण ही सर्वत्रिक व सर्वव्यापी बाब आहे. या पर्यावरणचा विपणनासह व्यवसायाच्या विविध क्रियावर परिणाम होत असतो.

बिजशब्द :–

नैसर्गीक घटक, पर्यावरण, विपणन क्रिया, विपणन पर्यावरण

प्रस्तावना :–

विपणन ही उत्पादनाला उत्पन्नामध्ये परिवर्तीत करणारी अत्यंत महत्वाची अशी प्रक्रिया होय. ही प्रक्रिया पार पाडल्याशिवाय उत्पादनाचे म्हणजे उत्पादीत वस्तुचे पैशामध्ये रूपांतर होणार नाही. या करीता विपणनाच्या सर्व क्रिया पार पाडाव्याच लागतील या सर्व क्रिया पार पाडीत असतांना विपणन कार्यावर परिणाम करणाऱ्या सभोवतालच्या घटकांना व परिस्थितीला एकत्रित पणे व्यावसायीक पर्यावरण असे म्हणतात. बाजारपेठेत सभोवताली पर्यावरणाचे विविध घटक आढळतात. विपणन शास्त्रातही विपणन पर्यावरणाची संकल्पना जुनी असली तरी तिची व्याप्ती,तिव्रता व प्रभावक्षेत्र दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यामुळे विपणनाचे कार्य किंवा प्रक्रिया ही बरेचदा, गुतागुंतीची जटिल अशी बनत जाते. यातुनच विपणन कार्यात बरेचदा अडचणी निर्माण होतात. या विपणन पर्यावरणाचा किंवा त्यातुन निर्माण होणाऱ्या समस्येचा आधिच अंदाज लागल्यास सावधगीरी बाळगता येते किंवा आलेल्या समस्यांचे तातडीने निराकरण ही करता येते.

विपणन पर्यावरणाचे घटक

विपणन पर्यावरणाचे प्रामुख्याने दोन घटक सांगता येतात.

१) अंतर्गत घटक/अंतर्गत पर्यावरण २) बाह्य घटक/बाह्य पर्यावरण

१) अंतर्गत पर्यावरण :–

विपणनाच्या अंतर्गत पर्यावरणमध्ये उत्पादन संस्थाच्या अंतर्गत असणाऱ्या विविध घटकांचा समावेश होतो. यात प्रामुख्याने मुल्य पध्दती, व्यवस्थापन संरचना, अंतर्गत सत्तासंबंध, मानवी संसाधने आणि उत्पादन प्रमंडळाची लौकीक प्रतिमा इत्यादी घटकांचा समावेश होतो. या सर्व घटकांचा विपणनाच्या विभिन्न क्रियांवर व व्यवस्थापकीय कार्यावर परिणाम होत असतो. हे परिणाम बरेचदा दुरगामी स्वरूपाचे देखील असु शकतात. यातुनच उत्पादन संस्थाच्या अस्तितत्वाचा देखील प्रश्न निर्माण होत असतो. त्यामुळे अशा घटकांचा शोध किंवा पुर्ण कल्पनाही हानी भयापासुन सावध होण्यास साह्यभुत ठरत असते. हे सर्व घटक अंतर्गत स्वरूपाचे असल्यामुळे हे नियंत्रण योग्य असतात, म्हणजेच यावर ताबडतोब नियंत्रण घालता येते.

२) बाह्य पर्यावरण :–

विपणनाच्या बाह्य पर्यावरणामध्ये ढोबळमानाने दोन भाग पडतात त्याला अर्थशास्त्रीय भाषेत सुक्ष्म व स्थल असे म्हटले जाते. सुक्ष्म मध्ये विपणन क्रियेमध्ये प्रत्यक्ष सहभागी असणाऱ्या घटकांचा समावेश होतो. जसे–पुरवठादार, विपणन मध्यरथ स्पर्धक, ग्राहक आणि शेवटचा ग्राहकसमुह, म्हणजेच संपुर्ण जनता होय. यात सर्व जनता संबोधण्याचे कारण असे की, ही संपुर्ण जनता म्हणजेच ग्राहकांचा एक मोठा समुदाय असतो. यातविविध संस्कृती, धर्म, सण, उत्सव या सर्वचा समावेश 'जनता' या संकल्पनेत होतो.म्हणुन पर्यावरणीय घटकामध्ये जनता हा सर्वात महत्वाचा घटक मानला जातो.

स्थुल पर्यावरणही एक व्यापक सज्ञा असुन व्यापक स्तरावर आणि दुरगामी असे परिणाम करणारे हे घटक असल्यामुळे यावर नियंत्रण ठेवने जरा अवघडच कार्य असते. त्यामुळे यावर उपाययोजना म्हणुन समुपदेशन हे सर्वात यशस्वी साधन असले तरी काही वेळेला सक्तीची उपाययोजना ही आवश्यक ठरते.

लोकसंख्या विषयक पर्यावरण

लोकसंख्या विषयक पर्यावरणामध्ये लोकसंख्या वाढीचादर, वयोगट, लिंगभेद, सरासरी आयुर्मान, कुटुंब नियोजन कार्यक्रम, रोजगारीचे स्तर व स्वरूप, साक्षरता, भाषा, धर्माचा यात समावेश होतो. या सर्वाचा सामुहिक असा प्रभाव विपणनाच्या विविध क्रियांवर पडत असतो. याचे

जर प्रतिकुल परिणाम विपणनावर पडायला लागले तर त्याची वेगळीच कल्पना आल्यास तातडीच्या उपाययोजना शक्य होतील.

सामाजीक पर्यावरण :–

सामाजिक पर्यावरण हे एक आगळे–वेगळे पर्यावरण असते. तरी त्याचा ही विपणन क्रियांवर सखोल असा परिणाम होत असतो. प्रत्येकच व्यक्ती हा समाजनिष्ठ असतो. त्याचीही काही सामाजीक मुल्ये असतात. एक विशिष्ट अशी संरचना व विचारसरणी असते. समाजानी बांधुन दिलेले काही नियम असतात. त्यालाच आपण परंपरा असे म्हणतो. या परंपरा वाईट जरी असल्यातरी त्या सहजासहजी मोडता येत नाहीत. यातुन विपणनावर बरेच अनिष्ठ परिणाम होतात. वर्षानुवर्षाच्या प्रयत्नानंतर सामाजिक पर्यावरणावर काही अंशी नियंत्रण घातले गेले हे मात्र मान्य करावेच लागेल.

आर्थीक पर्यावरण :–

अर्थव्यवस्थेमध्ये स्वरूप, विकासदर, राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई निर्देशांक, राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण इत्यादी घटक महत्व पुर्ण असतात. आर्थिक परिस्थीती इत्यादी बाबींचा विपणनावर प्रभाव पडत असतो. या शिवाय अधिकोषण, व्याजदर, कर्जपुरवठा, चलननियंत्रण, विदेशीकर्ज व त्यावरील बंधने याचाही विपणन कार्यावर परिणाम होत असतो. आर्थिक पर्यावरणाचा विपणन कार्यावर प्रत्यक्ष व्यापक व दिर्घकाळ असा प्रभाव पडत असतो. विपणनही मुळातच आर्थिक क्रिया असल्यामुळे आर्थिक पर्यावरणाचा विपणनावर होणारा परिणाम हा बरेचदा निर्णायक स्वरूपाचाही असतो.

नैसर्गिक पर्यावरण :–

नैसर्गिक पर्यावरणहा नियंत्रणाच्या पुर्णत: बाहेरचा म्हणजेच ज्यावर नियंत्रण घालता येत नाही म्हणजेच अनियंत्रित असा घटक असल्यामुळे विपणन पर्यावरणमध्ये या घटकाला सर्वात महत्वाचे स्थान आहे. हवामान, पर्जन्यमान, भुपृष्ठाची रचना, स्तर जमिनीची सुपीकता, तापमान, प्रादेशिक वैशिष्ट्ये, भुगर्भातील घडामोडी, नैसगिक संसाधने हे सर्व पर्यावरणीय घटक होय. या घटकांचा मुलगामी तसाच दुरगामी असा परिणाम होत असतो. मुलगामी यासाठी की बाजारपेठेतील मागणी ग्राहंकांच्या आवडी–निवडी, गरजा, मानसिकता यावर नैसर्गीक पर्यावरणाचा थेट प्रभाव पडतो. हा प्रभावच मुलगामी स्वरूपाचा प्रभाव होय. जर नैसर्गिक आपत्तीमुळे बाजारपेठेसमोर काही संकटे निर्माण होतात. त्यावर मात करणे फार कठीण गोष्ट आहे. त्यातुन निर्माण होणारे परिणाम हे दुरगामी स्वरूपाचे असतात.

या शिवाय सांस्कृतीक पर्यावरण, तंत्रज्ञानविषयक पर्यावरण कायदेविषयक पर्यावरण, राजकीय पर्यावरण, आंतरराष्ट्रीय पर्यावरण, बाजारपेठेविषयक पर्यावरण यांचा परिणाम हा घातकच असला

तरी हे नियंत्रण योग्य असल्यामुळे यावर वेळीच नियंत्रण घालुन प्रतिकुल परिणामापासुन सावधगिरी बाळगता येते.

निष्कर्ष :–

विपणन पर्यावरणाचा व्यवसायावर होणारा परिणाम हा त्या पर्यावरणाच्या स्वरूपावर अवलंबुन असतो. हे स्वरूप साधारणत: स्थिर, बदलते, एकजिनसी, बहुजिनसी आणि गतिमान पर्यावरणाचे असते. या सर्व स्वरूपाचे एकत्रीकरण करून त्यातुन निघणारा जो परिणाम असतो. त्यावर अधिक योग्य रितिने नियंत्रण घालता येते. कारण वेगवेगळ्या स्वरूपाला नियंत्रण घालणे अधिक क्लिष्ठ असल्यामुळे एकत्रित नियंत्रण घालणे अधिक सोयीचे असते. या पर्यावरणाचा आधीच शोध लागल्यास ते अधिक सोईचे असते, हा शोध घेण्यासाठी औद्योगीक हेरगीरी हा फार महत्वाचा मार्ग होय. अशारितीने विपणन पर्यावरणाची माहिती मिळवुन ती अद्यावत होत गेल्यास विपणन पर्यावरणाचे विश्लेषन अधिक परिणामीकरता येते.

संदर्भ :– १) विपणन व्यवस्थापणाची तत्वे व प्रणाली :–डॉ. प्रकाश एन. सोमलकर, सर साहित्य केंद्र, नागपुर

२) विपणन व्यवस्थापन :–डॉ. प्रभाकर देशमुख , विद्या प्रकाशन नागपुर

३) Inaustrial Marketing :-Cherunilam Francis Himalaya Publication

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
with
International Impact Factor 2.254

ISSN No. 2394-8426
Dec – 2015
Issue – I, Volume – V
Online Journal

दलित आत्मकथनांचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर

संशोधक
प्रा. संजय केशवराव लाटेलवार
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजुरा, जि. चंद्रपूर

मार्गदर्शक
डॉ. इसादास भडके
एफ.ई.एस. गर्ल्स कॉलेज, चंद्रपूर

दलित साहित्याचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आहेत. आंबेडकरवाद हीच दलित साहित्याची प्रेरणा आहे. दलित आत्मकथनं हा दलित साहित्याचा प्रगल्भ आणि संपन्न आविष्कार आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हीच दलित आत्मकथनांची प्रेरणा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेमुळेच दलित समाजाचे आत्मभान जागृत झाले हे सर्वमान्य आहे. प्रस्थापित जातीव्यवस्थेविरूद्ध आवाज उचलण्याची हिम्मत दलित आत्मकथनकारांना आली. तत्पूर्वी दलित समाज मूका होता. मूकनायक जागा झाल्यानंतर मुकसमाज बोलू लागला. आत्मकथनातून आपली जगण्याची कैफियत मांडू लागला. दया पवार लिहितात, "बलुत्यात आंबेडकरवाद नाही, अस बोलल्या जातं. प्रत्येक पात्राच्या तोंडी बाबासाहेब असे म्हणाले, बाबासाहेब तसं म्हणाले, अशी पात्रे त्यांच्या मगदुराप्रमाणे बोलू लागली असती म्हणजे त्यांना आंबेडकरवादाचा साक्षात्कार झाला असता. आंबेडकरवाद त्यांच्या शब्दातून, प्रतिमातून व्यक्त होतो. नुसत्या सांगितलेल्या तत्त्वज्ञानातून होत नाही. प्रत्यक्ष कृतीतून साक्षात्कार होणे महत्वाचे आहे."[१]

दलित आत्मकथनात पाहिजे त्या प्रमाणात डॉ. आंबेडकरांचे प्रेरणास्थान दृग्गोचर होत नाही. अशी टिका करण्यात येते. त्याला लक्ष्मण माने यांनी दिलेले उत्तर बोलके आहे. ते म्हणतात, "'उपरा' हे चळवळीला आलेले यश आहे. मी चळवळीत वाढलो. चळवळीनं मला मोठं यश दिलं. फुले, आंबेडकर, शाहू महाराज, भाऊराव पाटील यांच्या विचारांनी आयुष्य घडविल्या गेलं."[२]

प्र. ई. सोनकांबळेच्या 'आठवणीचे पक्षी'वर आरोप केल्या जातो की नायक 'जयभीम' सुद्धा म्हणत नाही. भीत—भीत प्रल्हाद हा नायक जयभीम करतो. यावर भाष्य करताना डॉ. आरती कुसरे—कुलकर्णी म्हणतात, "खरे म्हणजे ही टिका बरोबर नाही.

सोनकांबळे जेव्हा 'आठवणीचे पक्षी' मधून आपले दु:ख मांडतो तेव्हा त्यामागे आंबेडकरी विचार, दलित चळवळीचा परिणाम आणि सामाजिक जाणीव या गोष्टी असतात. प्रल्हाद भीत—भीत 'जयभीम' करतो तो इथल्या समाजव्यवस्थेने त्याच्या मनात जो न्युनगंड निर्माण केला त्याचे प्रतीक आहे."[३]

शरणकुमार लिंबाळे यांनी 'अक्करमाशी'त जेव्हा दु:ख मांडतात तेव्हा त्यांना बुद्धाची आठवण येते. सर्व अशांतीचं करण दु:ख आहे हे बुद्धानी सांगितलं. याची जाणीव शरणकुमार लिंबाळेंना येते. आणि पुढे ते आंबेडकरी प्रेरणा सिद्ध करतात. ते म्हणतात, "मी नमस्कार म्हणायचेच सोडलो, जयभीम म्हणू लागलो. मी आंबेडकर म्हणायचं सोडलं बाबासाहेब म्हणू लागलो. माझ्या तरूणाईला अर्थ मिळाला. रक्त शरीरभर लाव्हासारखं उसळायचं. विचार अराजक शांततेत भडकत राहायचं. बाबासाहेबाचा पुतळा पाहिला की सातजन्माच्या आईला भेटल्यागत व्हायचं. अन्याय अत्याचाराच्या बातम्यानं जळायचं. अस्वस्थ व्हायचं."[४]

दलित आत्मकथनाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये मांडताना डॉ. वासुदेव मुलाटे लिहितात, "सर्व आत्मकथनांच्यामधून एखाद दुसरा अपवाद वगळला तर या ना त्या स्वरूपात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे, त्यांच्या विचारांचे, कार्याचे कृतज्ञापूर्वक उल्लेख येतात. किंबहुना त्यांच्या विचारांची प्रेरणाच या लेखनाच्या मागे असलेली दिसते."[५]

दलित साहित्याने आधुनिक मराठी साहित्यविश्वात जाणिवेचा एक नवा प्रवाह आणला. दलित आत्मकथने दलित साहित्य निर्मितीचा मौलिक असा अविष्कार आहे. दलित आत्मकथनातील समाजविषयक जाणिवा स्पष्ट करताना प्रा. माधुरी पाटील म्हणतात, "आमची दलित आत्मकथने ही आंबेडकरी विचार चळवळीशी निगडित आहेत. त्याचा प्रत्यक्षाप्रत्य प्रभाव त्यावर आहे. आपले जीवनानुभव परखडपणे आणि विमुक्तपणे मांडणे हा आरंभप्रभावच त्याचे द्योतक आहे. आत्मजाणीव ही आंबेडकरी प्रेरणा आहे. ती सर्व दलित आत्मकथांतून प्रकट झाली."[६]

नवदोत्तर आंबेडकरी स्वकथनाचे बदलते स्वरूप मांडताना प्रा. अशोक इंगळे म्हणतात, झालेली ही स्वकथने पहिल्या पिढीतील सर्वार्थाने भिन्न आहेत. आंबेडकरी

लेखकांनी कवितेनंतर स्वकथनामधून आपले जीवनानुभव आविष्कृत केलेले आहेत. खरे तर ही स्वकथने आंबेडकरी साहित्याचे एक सांस्कृतिक संचित ठरली आहेत."[७]

अस्पृश्यतेची जाणीव डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या आत्मजाणीवेमुळे दलितांमध्ये आली. या जाणिवेचे प्रतिबिंब दलित आत्मकथनात उमटले याची जाणीव डॉ. गजानन बनसोड करून देतात. "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'गावगावकी' आणि 'हाडकी हाडवळ' सोडून द्या! आणि 'शहरांकडे चला' असा आदेश दिला. अनेक दलित कुटुंबांनी शहराकडे धाव घेतली. गावात त्यांच्यावर कशाप्रकारे जुलुम, अन्याय, अत्याचार होतात ही कल्पना डॉ. आंबेडकरांना होती. म्हणून संपूर्ण दलितांमध्ये आत्मसन्मानाची ज्योत चेतवली. गावगाड्यातील अनेक प्रसंगात अस्पृश्यतेमुळे झालेल्या जाचाचे वर्णन आत्मकथनात येते."[८]

दलित स्वकथने ही आलेल्या अनभवातून, चिंतनातून निर्माण झालेली आहेत. यातील सामाजिक जाणिवेचा ओतप्रोत आलेख डॉ. मिलिंद भिलपवार याप्रमाणे मांडतात, "दलित आत्मकथनांनी दलित साहित्याला 'वास्तव' करण्यात मोलाची मदत केली. हे साहित्य म्हणजे आपला काळा इतिहास आहे की, जो माणसाणेच माणसावर लादला. काळ बदलला आणि दलित जाणीव कमी होत आहे. महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांच्या प्रेरणेने, शिकवणीमुळे समाज बदलत आहे."[९]

स्त्रियांच्या आत्मकथनांवर दृष्टिक्षेप टाकताना डॉ. विलास तायडे स्पष्ट करतात, "आंबेडकर चळवळीतून दलित स्त्री लेखिका झाली. आंबेडकरी प्रेरणेतून ती लिहू लागली व स्वत:च्या अनुभवातून ती व्यक्त होऊ लागली आहे, यात शंका नाही."[१०]

दलित आत्मकथनातून प्रगल्भ सामाजिक जाणिवा प्रकट करताना दलित आत्मकथनकारांनी 'आत्मकथन' हा शब्द रचनाबंद स्वीकारला याची नोंद प्रा. श्यामराव जाधव घेताना लिहितात, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या प्रेरणेमुळे तळागळातील समाजात चेतना निर्माण झाली. ह्या समाजाने परंपरेने चालत आलेल्या जातीय विषमतेमुळे माणसांना पशूहुनही वाईट जीवन जगावे लागले याचे भान आले. पांढरपेशा सवर्ण समाजाच्या अनुभवाच्या कक्षेबाहेर असलेले विदारक अनुभव तशाच जळत्या भाषेत मांडावे

असे दलित लेखकाला वाटू लागले आणि आंबेडकरी प्रेरणेतून त्यांनी आत्मकथनाचा रचनादीप स्वीकारला."[११]

दलित आत्मकथनातील वास्तव मांडताना डॉ. राजकुमार खर्चे दलित आत्मकथनामागील प्रेरणेचा सुतोवाच करताना म्हणतात, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'शिका' या शिकवणुकीने भारावून गेलेल्या आणि आंबेडकरावादाचा ज्यांच्यावर विलक्षण प्रभाव होता, अशा समाजाने स्वत: अशिक्षित परंतु सुसंस्कारीत असण्याने आपल्या मुला—मुलींना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले. मिलिंदमध्ये बहुसंख्य विद्यार्थी दलितातील, भूमीहीन समाजातील, आईबाप मोलमजुरी करणारे म्हणजे दास्याच्या चिखलात रूतून बसलेले. ही मुले जेव्हा गावी जात होती तेव्हा तेथील दैन्य, दास्य, उपेक्षा, जातिभेद पाहून दुभंगत."[१२] यातून प्र. ई. सोनकांबळे यांच्यासारखे 'आठवणीचे पक्षी' हे आत्मकथन आकाराला आले.

'मिटलेली कवाडे', 'रात्रदिन आम्हा', 'माझी मी', 'मी वनवासी', 'मरणकळा', 'मला उध्वस्त व्हायचंय' यासारख्या स्त्रियांच्या दलित आत्मकथनांचा वेध घेताना प्रा. सारिका पाचराऊत आंबेडकरी प्रेरणेविषयी लिहितात, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक कृतिमधून दलित स्त्रीला अस्मिता व आत्मभान लाभले. ती उभी राहिली. आपल्या व्यथा, वेदना मांडू लागली. लिहू लागली. दलित साहित्यात तिने आपले एक वेगळे भावविश्व निर्माण केले जिथे माणसाला माणूसपण नाकारले तिथे स्त्रीआणि दलित स्त्री आत्मकथन वाचल्यावर जाणवते."[१३]

दलित आत्मकथनातील वास्तवातील जाणीव करून देतांना प्रा. एस. आर. गाडगे दलित आत्मकथनाच्या वाटचालीचा मागोवा घेताना म्हणतात, "फुले—आंबेडकरांच्या विचारामुळे दलित माणसाला आत्मभान लाभले. त्यातून वर्णात्मक व्यवस्था, जातिव्यवस्था यांनी नाकारले असले तरी इतरांप्रमाणे बरोबरीने जगण्याचा मलाही अधिकार आहे. ती आत्मभान प्राप्त झालेली स्थिती दलित साहित्यात प्रतिबिंबित झालेली आहे. आत्मकथेस आत्मशोधाची प्रक्रिया, नकार आणि विद्रोहाकडे वळते. आत्मकथेतील आत्मभाव 'स्व'चा

शोध, समानतेची वागणूक, जाणीव, विषमतेचा धिक्कार हेच दलित साहित्याचे आदिकारण आहे."[१४]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक क्रांतीचा परिणाम दलित समाजावर झाला आणि ह्याचे प्रतिबिंब दलित आत्मकथनात उमटले. असा निष्कर्ष काढतात. प्रा. विनोद इंगळे म्हणतात, "डॉ. आंबेडकरांच्या क्रांतिविचाराणे प्रेरित होऊन दलित समाजातील शैक्षणिक पहाट साहित्याला कारणीभूत ठरली व आपल्या उजेडाच्या गीताने तिने शतकानुशतकांचे बहिरेपण मोडीत काढले. समाजाचे विषम जगणे तिने नाकारले. दलित आत्मकथने त्याच पहाटेचा वास्तव आविष्कार मानावे लागतात."[१५]

दलित स्त्रियांच्या आत्मकथनाविषयी डॉ. बी. टी. अंभोरे आपले मत मांडतात, "दलित आत्मकथनाच्या मागे डॉ. आंबेडकरांची प्रेरणा होती. त्यातुनच दलितांच्या जगावेगळ्या जगण्याचे असंख्य प्रश्न उलगडले. समग्र दलित शोषितांच्या जगण्याचे, स्त्रियांच्या विदारक वास्तव समोर आले."[१६]

दलितांची आत्मकथने वेदनेचे वाङ्मय असून तो सांस्कृतिक दस्ताऐवज आहे. ते अनुभवाचं रसायन आहे ही प्रतिक्रिया नोंदवतांना डॉ. प्रतिभा आवंडकर म्हणतात, "आत्मकथा हा दलित साहित्यातील अनुभूतीचा सर्वात समृद्ध भाग म्हणावा लागेल. त्यातून दलित जीवनाचे भोग, त्याची दाहकता मनाला अस्वस्थ करणारी असते. स्वत: कथा कथन करणरा आपले आजवरचे जीवन कसे कसे घडत गेले, त्याविषयीच्या आठवणी तो सांगत असतो. तद्वतच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाने व चळवळीने, त्यांच्या सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक जीवनात कसा बदल झाला, हे सत्य पाहण्याचाही त्याचा प्रयत्न असतो. दलित साहित्यातील आत्मकथा म्हणजे दलितांच्या वेदनेंचे आलेख आहेत."[१७]

दलित आत्मकथने लिहिण्यामागील प्रेरणा ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आहे. दलित साहित्य बाबासाहेबांच्या विचारातून साकार होऊ लागले. त्याचे प्रतिबिंब दलित आत्मकथनातून सिद्ध होऊ लागले. दलित आत्मकथनातून व्यक्त झालेल्या अनुभवांना डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी लिहिते केले. समाजमन जागृत झाले आणि ते जागृत मन

शब्दामधून प्रकट होऊ लागले. स्वत:बद्दल साहित्यात दलित कधी बोललाच नाही. तो काव्यातून विद्रोहाच्या पातळीवरून व्यक्त होतांना अनुभवाचे गाठोडे रिक्त करू लागला. माणूस म्हणून जगण्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमुळें बळ मिळाले. ते बळ जिवंत अनुभवातून, आत्मकथनातून पटलावर आणले. आत्मकथाकाराच्या मांडणीला आणि अनुभवाला जी वैचारिकता प्राप्त होते त्यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेचे सूत्र आहे. दलितांची आत्मकथने अधिक अंतर्मूख व आत्मशोधक असून बाबासाहेबांमुळे आत्मभान आले याचे प्रतीक आहे. त्यामुळे शिकलेल्यांनी आपल्या वेदना व्यक्त करण्यासाठी आत्मकथन लिहिण्याचा मार्ग निवडला. दलित आत्मकथनांचे निराळेपण हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारामुळे प्रतीत होते.

संदर्भ सूची :

१) पवार दया, 'बलुतं' एक झाडा झडती', अस्मितादर्श, दिवाळी अंक, औरंगाबाद, १९८३, पृ. १६

२) माने लक्ष्मण, 'उपरा', 'चेहरा मोहरा' (प्रस्तावना) ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९८०, पृ. ०२

३) कुसरे—कुलकर्णी आरती, 'दलित स्वकथने : साहित्यरूप', विजय प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १९९१, पृ. १९

४) लिंबाळे शरणकुमार, उ.नि.पृ. ७१

५) मुबाटे वासुदेव, उ.नि.पृ. ७२

६) पाटील माधुरी, 'दलित आत्मकथातील समाजविषयक जाणिवा' (लेख), दलित आत्मकथने : चिंतन आणि चर्चा' (संपा. रविंद्र केदार/गोपाल ढोके) अथर्व पब्लिकेशन, धुळे, प्र.आ. २०१३, पृ. १४

७) इंगळे अशोक, तत्रैव, पृ. ३०—३१

८) बनसोड गजानन, तत्रैव, पृ. ४१

९) भिलपवार मिलिंद, तत्रैव, पृ. ४६

१०) तायडे विलास, तत्रैव, पृ. ६३

११) जाधव श्यामराव, तत्रैव, पृ. ७१

१२) खर्चे राजकुमार, तत्रैव, पृ. ७५

१३) पाचराऊत सारिका, तत्रैव, पृ. ११३

१४) गाडगे एस.आर., तत्रैव, पृ. १४३

१५) इंगळे विनोद, तत्रैव, पृ. १४९

१६) अंभोरे बी.टी., तत्रैव, पृ. १५६

१७) आवंडकर प्रतिभा, तत्रैव, पृ. १६४

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
with
International Impact Factor 2.254

ISSN No. 2394-8426
Dec – 2015
Issue – I, Volume – V
Online Journal

विश्वजाणीवेचा कवी अरूण काळे

संशोधक
प्रा. रंजीत वानखेडे
जनता महाविद्यालय, चंद्रपूर

मार्गदर्शक
डॉ. इसादास भडके
एफ.ई.एस. गर्ल्स कॉलेज, चंद्रपूर

कवी अरूण काळे यांच्या काव्यात विश्वजाणीव जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर प्रकर्षाने वृद्धिगत झालेली आहे. 'विश्वाची माझे घर' या भावनेनी ओतप्रोत असलेली ही कविता आहे. नवीन माहितीच्या युगामुळे संपूर्ण जग एवं खेडे झालेले आहे. 'वापरा आणि फेका' या नवीन आदर्शाप्रमाणे आजचे स्वरूप जागतिक पातळीवर आहे. दलित शोषित 'ग्लोबलचं गावकूस' झालेले आहे. जगण्याची शैली बदलली असून माणूस कृत्रिम जगत आहे. गरीब गरीब होत आहे, श्रीमंत श्रीमंत होत आहे. मुखवट्याचे जग आकाराला आलेले आहे. मानवता वेशीवर टांगल्या जाऊन विषमता आपले साम्राज्य निर्माण करीत आहे. या साऱ्यांचे चित्रण कवी अरूण काळे यांच्या कवितेत आविष्कृत होते. 'रॉकगार्डन' या कवितासंग्रहातील कवितांबद्दल बाबुराव बागूल म्हणतात, "पृथ्वीच्या जन्मकहाणीची यात येते ही गोष्ट मानवी समाजाच्या इतिहासाकडे पाहण्याच्या कवीचा दृष्टिकोन किती विशाल आहे हे स्पष्ट होते. ही गोष्ट मराठी कवितेत क्वचित आढळते. हेगेल आणि डार्विन यांनी माणसाबद्दल जी मते मांडली, त्या मतांशी नाते जोडण्याचा प्रयत्न कवी करताना दिसतो. ही विश्वात्मकता दलित कवितेत कां आढळते? तर जातिवास्तवाने आणि वर्णवर्चस्ववादाने दलित जीवनाला काही दिलेले नाही. दिले फक्त दु:ख, दैन्य आणि दास्य; परंतु युरोपात उदित झालेल्या तत्त्वज्ञानाने व राजकारणाने दलित जीवन मुक्त करण्यात मदतच केली आहे. म्हणून दलित कवितेत भारतीय पुराणाबद्दल आणि पौराणिक पुरूषांबद्दल किंचितसेही ममत्त्व दिसत नाही."[१] परंतु अब्राहम लिंकन, जेफर्सन, मार्टिन ल्यूयर लिंग (जू.), मार्क्स, लेनिन, वॉल्टेअर, नेल्सन मंडेला या सर्व आणि इतरही थोर मानवतावाद्यांबद्दल आत्यंतिक आदर असतो. इतका मोठा आदर मराठी कवितेत आता आणि पूर्वीही कुणी व्यक्त केलेला नाही. दलित कविता ही शंभर टक्के भारतीय कविता असूनही हिच्याएवढे विश्वाव्यापकत्व परपुष्ट मराठी कवितेत आढळत नाही. अरूण काळे यांच्या कवितेतील हे विश्वव्यापकत्व कविता संग्रहाच्या नावापासून व कवितामधूनही आपणाला दिसते.

बोन्साय केलेल्या मानवी जगाचे चित्र कवी 'रॉकगार्डन' मध्ये विश्वात्मक पातळीवर रेखाटतात. 'नेल्सन मंडेला' या कवितेतून अरूण काळे विश्वात्मक जाणिवा व्यक्त करताना म्हणतात,

"तुला देताहेत 'गार्ड ऑफ ऑनर'!
या उध्वस्त प्रकाशशबाका, कवडसे
आणि किरण
तुझ्या पूर्ण स्वातंत्र्याला
कुणी पूर्ण थोपवू शकत नाही
'केप ऑफ गुडहोपला'
वळसा घालून जाताना
कुठलाही विचार तुला ओलांडून
जाऊ शकत नाही
माणसाच्या मुक्तीचे गाणे तुझ्याशिवाय

पूर्ण होऊ शकत नाही”[२]

तथागताचे स्मित हास्य ही कवितेतील जागतिक जाणीव कवीने मांडली आहे. ‘भूक : एक सार्वत्रिक उद्‌भव’ या कवितेत कवी अरूण काळे भूकेचे व्यापकत्व प्रतीत करताना म्हणतात,

“पृथ्वीच्या उदयापासून उगवलेली
भूक...
तमाम जीवजिवाणूंना
पोटात लक्ष केंद्रित करायला लावणारी भूक
भूक आदिम सत्य भूक”[३]

मानवी जीवन कसं गोलगोल झाले हे कवी अरूण काळे ‘वल्डकप फुटबॉल’ या कवितेतून जागतिक संदर्भ देत जीवनावर भाष्य करतात,

“वल्डकप फुटबॉल
लाईव्ह प्रक्षेपण आणि
देखणी हिरवळ
‘पेलेची’ चर्चा
वलयांकित ‘मॅराडोना’
प्रेक्षकांचा हैदोस
आम्हीही होतो फुटबॉल,
कधी काळी आणि
खेळतो आज फुटबॉल
घरातल्या घरात”[४]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची उजेड पसरवण्याची प्रेरणा ही कवीच्या विश्वजाणिवेला आविष्कृत करणारी आहे. “कवीनी नेल्सन मंडेलांना लोकसम्राट पद बहाल करून मंडेला जोहान्सबर्गच्या सोन्यापेक्षाही तेजस्वी असल्याचे म्हटले आहे. इथे कवीच्या संवेदनशीलतेची कक्षा किती रूंदावलेली आहे हे स्पष्ट होते. अश्रूबरोबरच भाकर खात वाढलेला अरूण काळे सारखा एक कवी अश्रूंचे अनेक रंगही ओळखतो. त्यांची डागडुगी करून अश्रूंना घासून पुसून घ्यायला तयार होतो; परंतु कवीची एक अटही आहे. ती म्हणजे ते आज माणसांसाठी जगले पाहिजेत, एवढी प्रभावी कविता मराठी साटस्वतात अभावनेच मिळेल. यावरून कवीचे जाणीवविश्व किती समृद्ध आहे, याचा अंदाज येतो.”[५] असे डॉ. सिद्धोधन म्हणतात. यावरून कवीच्या विश्वजाणीचे स्वरूप लक्षात येते.

‘सायरनचे शहर’ यात कवीला दंगलीत उध्वस्त होत असलेल्या मानवी जीवनाची झालेली वाताहत अस्वस्थ करणारी आहे. जग हे मूलतत्त्ववादी विरूद्ध विज्ञानवादी आहे. धर्म, जात, लिंग, वर्ग, वंश यांच्या अदकारातून दंगली निर्माण होतात. याला संपूर्ण जग अपवाद नाही. धर्म ही जागतिक संकल्पना असून ती सर्वत्र कार्यरत आहे. ‘सायरनचे शहर’ प्रातिनिधिक स्वरूपाचे आहे. दंगलीत माणूस बेचिराख होतो हे जागतिक सत्य आहे. याचा लेखाजोखा कवीचे काव्य मांडते. कवी रक्ताचा संबंध सम्राट अशोकांच्या कलिंग युद्धाशी जोडतात. माणसाचे व्यापकत्व मांडताना ‘माणूस एक नैसर्गिक प्रतिक्रिया’ या कवितेत माणूस चांगले आणि वाईटही करणारा आहे असे सांगतात,

“तू म्हणतोस प्रेम म्हणजे ईश्वर
तू प्रेमाला ठोकरलय द्वेषाला क्रुसावर

गॉलथानच्या टेकड्यावर
तू घोडे विकून निर्धास्त झोपणारा
तू ठणठणाऱ्या ठिणग्या ठेरणारा
वातावरणाला भोक पाडून आलम
जीवांची कबर खोदणारा
कबुतरांच्या पंखावर बसून
हैड्रोजन, व्यक्तिअरला वात देणारा"[६]

कवी अरूण काळे वंशवादाला आपल्या कवितेतून व्यक्त करतात. 'त्यांच्यासाठी प्रार्थना करू या!' या कवितेतून वैश्विक जाणिवेचा परिचय घडवतात,

"रॉडनी किंग
तू म्हणजे देव नाहीस, धर्म नाहीस
जात किंवा पक्ष नाहीस
तुझा प्लस पॉईंट म्हणजे तू असतो काळा
आणि तुच्छतेचे कारण वंशवाद भिरकावलेला
कचऱ्याच्या पेटीत
कायदा उभा राहाते तुझ्या बाजूनं"[७]

द्वेषातून दंगली माजतात. ती दंगल कुठलीही असो. संपूर्ण जगात धर्माच्या नावाने लपंडाव सुरू आहे. तो गळून सारे प्रेमभावाने वागले पाहिजे असा आशावाद कवी 'छळछावणी' या कवितेतून करतात,

"आता द्वेषाचे मनसुबे कुरवाळू नका
आता वेड्या आशेवर जगू नका
ह्या प्रेमवृक्षाचे जेरूसलेम हेच आहे
त्यांचा देश हा तुमचा देश आहे"[८]

'इतिहासाची हरवलेली पाने' या कवितेतून कवी अरूण काळे जागतिक इतिहासाचा हवाला देत म्हणतात,

"इतिहास जगभर असतो
अन् असतात गुलामांचे
अन् दु:ख वेदनांचे उल्लेख
अन् असतात त्यासाठी बळी गेलेले
अन् खून झालेले महामानव"[९]

'नंतर आलेले लोक' हा काव्यसंग्रहातून विश्वजाणिवा प्रगल्भपणे आविष्कृत झालेला आहेत. जागतिकीकरणाच्या दुनियेत माणूस जागतिक पातळीवर भरडल्या जात आहे. याची तीव्र जाणीव करून देणाऱ्या कविता आकाराला आलेल्या आहेत. या कवितांचे प्रत्यय जागतिक स्वरूपाचे आहे. "आजच्या कविता हा एकूणच मराठी कवितेच्या महत्त्वाचा टप्पा आहे. भारतीय कवितेतील नवे वळण आहे. आजतरी या कवितेच्या पुढे इतर कोणती कविता असू शकेल असे वाटत नाही. 'नंतर आलेल्या लोक' सारख्या कविता पुन्हा निर्माण होतील, याबद्दल काही भविष्य वर्तवता येत नाही. पुढची दहा—पंधरा वर्ष वाट पाहावी लागेल. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकावर अरूणच्या कवितेचे साम्राज्य आहे.

पावशतकभर ती झळकतच राहील आणि इतिहासात तिला मरण नाही. कोणत्याही काळात ती काळाच्या कसोटीवर उतरली आहे. बदलत्या युगाच्या जाणिवा एवढ्या ताकदीने आजपर्यंत मराठी कवितेने मांडलेल्या नाहीत, हेही आवर्जून नोंदविण्यासारखे आहे."[१०]

नंतर आलेल्या लोकांनी माणूस शोधला नाही. जागतिकीकरणाच्या नावावर 'ग्लोबल' संस्कृती लादल्या गेली. सारे जग जवळ आले अशा वल्गना करू लागले. म्हणून कवी मार्मिकपणे उपरोधिक भाष्य करतात,

"तुझी वैश्विक आढी
ट्रेडमार्कची दाढी
चिंतनाची गुणगुण
श्रद्धेची तुणतुण
तुझी तिथ्या गाडी
तू झोकतोस भाडी
भक्तीची भावाची
निसर्गाची, माणसाची
अन् क्रांतीचीही"[११]

उधारीकरणाची सायबर खिंड झालेली असून 'जसं विचारलं जातं नाव—गाव वेश्येला एकांतात' तसं स्वरूप आले. माणूसच एक भंगार झालेला आहे. इंटरनेट आले. प्रचंड क्रांती झाली. पण माणूस आपले अस्तित्व गमावून बसत आहे. या साऱ्यांचा लेखाजोखा कवी अरूण काळे मांडतात तेव्हा सलगपणे वैश्विक जाणिवा प्रकट होतात. 'प्रेमाचं होऊ द्या जागतिकीकरण' या कवितेत कवी म्हणतात,

"नातेवाईकांनी फोन आणि क्रेडिट कार्डची चौकशी केली
प्रत्यक्ष भेटण्याआधी दोघांनी घेतला घटस्फोट इंटरनेटवर"[१२]

कवीने 'नाती संपली म्हणजे...' या कवितेतून माणसं माणसांपासून दूर चालली हे कवीने ध्वनीत करून माहिती तंत्रज्ञानाच्या युगाचे असंवेदनशीलता स्पष्ट करतात,

"हे ज्ञान—विज्ञान—तंत्रज्ञान निर्माण करील
पिकासो, हुसेन, बॅडमन, गावस्कर
पेले, ओवेन्स, मायकेल किंवा रफी
एकत्र किंवा अलग—अलग
हे ज्ञान विज्ञान तंत्रज्ञान निर्माण करीण
आदर्श गुलाम, इसाप, स्पार्टाकस,
किंवा सिदनाक
हे ज्ञान—विज्ञान—तंत्रज्ञान नष्ट करतयं
मातृत्वाला, निर्मितीच्या अजोड आनंदाला
हे सर्वगुण संपन्न आदर्श पुतळे किंवा उमी
केव्हाही येतील स्क्रॅपमध्ये"[१३]

जागतिक पातळीवर जागतिकीकरणाने 'ग्लोबलचं गावकूस' झालेले आहे. हे विषद करताना कवी अरूण काळे म्हणतात,

"झुलू खेड्यात वाहतं झुळुझुळु

विश्वचषकाचं उरलेलं पाणी"[१४]

'मल्टीलुटालुटीचा शिंग लपालपा' या काव्यातून कवीने जागतिकीकरणाचे वाभाडे काढले असून या वातावरणात माणूस कसा न्हाऊन निघत आहे याचे शब्दांकन केलेले आहे. यात तुबड्यांची कोंडी झाली आणि समूह अस्ताव्यस्त झाले. "अरूण काळे यांच्या सर्वच कविता संवेदनशील वाचकाला आवाहक वाटतात. भाषा आणि प्रतिमांच्या माध्यमातून अरूण काळे यांनी वाचकांशी केलेला संवाद बहुत्माला आहे. कवी वैश्विकभाव जोपासणारी कविता लिहीत असल्याने ही कविता वाचकांच्या वैश्विक जाणिवा विकसित करताना दिसते. अरूण काळे आत्मयतेपेक्षा व्यापकदृष्टीने जगाकडे पाहतो. त्यामुळे त्याच्या कवितेतून वैश्विक भावना ग्रंथित होते."[१५] असे प्रा. नंदकुमार मोरे म्हणतात.

'ग्लोबलचं गावकूस' हा कवितासंग्रह शीर्षकावरूनच विश्व जाणिवेचे संकेत देणारा आहे. कवी अरूण काहै 'ग्लोबनचं गावकूस' या काव्यसंग्रहातील 'स्वत:बद्दल' म्हणतात, "मी ज्या कवितेशी नाते सांगतो ती जगभर सर्वात जास्त लिहिली वाचली जाणारी कविता आहे. ही कविता माणसांच्या नात्यामधील जटीलता, विसंवाद, अंतर्विरोध यांची संगती लावण्याचा प्रयत्न करीत आहे. मुळात माझें जगणं एका कार्यकर्त्याचं जगणं असल्यामुळं माझी कविताही त्या जगण्याचा भाग आहे. केवळ जन्मामुळे वाट्याला येणाऱ्या उपेक्षांमागची कारण नष्ट व्हावीत असं जगताना वाटतं, तसेच माझ्या कवितेलाही वाटतं." असं जे कवी अरूण काळे म्हणतात त्यातून त्यांना विश्वजाणिवेशी निगडित आहे.

कवी अरूण काळे यांच्या कवितेतले जागतिक संदर्भ विश्वात्मकतेशी जोडलेले आहेत. 'प्रसन्न काळं देखणेपण' या कवितेत यांचा प्रत्यय येतो,

"बुद्धाच्या जनरेटरची
बिनागॅप जनरेशन
मांडवातील फुलांच्या जाळाला
सॅल्युट मारून
दिव्यत्वाची प्रचिती दावून
व्हिटॅमिनची पानं चावून
मॅक्शिमम पदरसा पाहून
मायकोचा डोस घेऊन
पॉल सबला भाताच्या अवनात
लढली होची, नाची चिन्ह
गवतांच्या टोप्यात
फिडेल—चे स्वरांची लिपी लॅटीन
पाल्लो इलो मिरची झटका कठीण"[१६]

'खाऊजा' संस्कृतीमुळे जगात प्रचंड बदल होत आहेत. याचा बरा—वाईट परिणाम तळागाळातल्या घटकांना सोसावा लागत आहे. ग्लोबलाईजेशनमुळे त्यात भर पडली. झगमगाटात या साऱ्या घटकांकडे दुर्लक्ष होत आहे. हा सदंर्भ जागतिक उलादालीशी आहे. या साऱ्यांचे मर्म कवीला कळले आणि त्याचे अधोरेखण कवी व्यापक जाणिवेने करतात. 'ग्लोबल खेड्याचे ग्लोबल येडे' यात मिष्किलपणे कवी लिहितात,

"वर्गविहीन, शोषणरहित, माणसाचं
जागतिकीकरण हाणून पाडून आता

विषमतेच्या साम्राज्याला दिलं नाव ग्लोबलगाव
महानघराचं गाव करून येड्यात काढलं की राव"[१७]

'बौद्ध गया विचार आहे' या कवितेतून कवी अरूण काळे विचारांचे अनन्यसाधारणत्व व्यक्त करतात,

"बौद्ध गया एक स्थळ नाही
गाव नाही की इलाखा नाही
बौद्ध गया एक विचार आहे
अंतिम"[१८]

जागतिकीकरणामुळे झपाट्याने बदल होत आहेत. माणूस आणि संगणक यांचा खेळ सुरू आहे. एकप्रकारे संघर्षच सुरू आहे. शहराचा विस्तार झपाट्याने सुरू आहे. हे कवी मांडतात,

"ऑक्ओपसारखा झाला शहराचा विस्तार
रस्ते चौपदरी झाले, माणसं एकपदरी
सुंदर वाहतूक बेटं झाली आणि
लोकं राहू लागले आपआपल्या बेटावर
कुठं हरवलं हे शहर?
मोहोंजोदडोसारखं खणूनही सापडणार नाही?"[१९]

कवी अरूण काळे नव्या युगाची कविता घेऊन वाटचाल केलेली आहे. अरूण काळे यांनी जागतिक विचारसरणी जोपासली. युग प्रवर्तक जाणिवा कवी व्यक्त करतात. जागतिक पातळीवर इतिहास काळापासून वर्तमानापर्यंत वेगवेगळ्या ठिकाणी घुसखोरी करून स्थानिकांना, मूळ निवासींना एक तर दीन, दास, गुलाम केले किंवा त्यांना त्यांच्याच भूमीत हद्दपार केले. याविषयी कवी अरूण काळे यांची कविता बोलते. त्यांच्या कवितेला चौफेर दृष्टी लाभली. तिनही काळाचा वेध घेत विश्वात्मक जाणिवांची पखरण करणारी कविता अरूण काळे यांची आहे.

संदर्भ सूची :

१) काळे अरूण, 'रॉकगार्डन', उ.नि.पृ. ५७
१) तत्रैव, पृ. ७७
३) तत्रैव, पृ. ८२
४) कटारे मोतीराम/अहिरे गंगाधर (संपा.), उ.नि.पृ. १२२
५) काळे अरूण, 'सायरनचे शहर', उ.नि.पृ. १८
६) तत्रैव, पृ. २८
७) तत्रैव, पृ. ५८
८) तत्रैव, पृ. ६२
९) तत्रैव, पृ.४४
१०) तत्रैव, पृ. १४
११) तत्रैव, पृ. ३९
१२) तत्रैव, पृ. ४३
१३) तत्रैव, पृ. ७६
१४) कटारे मोतीराम/अहिरे गंगाधर (संपा.), उ.नि.पृ. १५२

१५) काळे अरूण, 'ग्लोबलचं गावकूस', उ.नि.पृ. १०
१६) तत्रैव, पृ. २९
१७) काळे अरूण, 'सायरनचे शहर', उ.नि.पृ. ०२
१८) काळे अरूण, 'रॉकगार्डन', उ.नि.पृ. ४४
१९) तत्रैव, पृ. ५५

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
with
International Impact Factor 2.254

ISSN No. 2394-8426
Dec – 2015
Issue – I, Volume – V
Online Journal

Indian Cultural Ethos In Nissim Ezekiel's Poetry

Dr. A.V.DHOTE
HoD,Dept. of English,
S.P.College,Chandrapur

Abstract:

Every writer tries to assert his national identity in one way or another. This is true of the most of the writer of the common wealth countries. They used English language as an instrument to express their national aspiration or to describe their peculiar culture. While discussing the Indian ethos in the poetry of Nissim Ezekiel, it is imperative to keep in the mind that here is a writer who has declared his intentions to be rooted in India. This Indianess may take several forms and shapes, and may appear in work of art in diverse ways, obvious and subtle-but it is quality which is unmistakably present in the finest works of all Indian writers, whether they write in their mother tongue or in English. Modern India is a synthesis of many cultural cross currents and modern India, in Mulk Raj Anand's words, is conscious of 'the double burden on my shoulders, the Alps of the European tradition and the Himalaya of my Indian Past…" [1]

Key Words:

Indian Cultural Ethos, Multiculturalism, Indianess, Cultural identity.

Introduction:

Like all commonwealth poets, Nissim Ezekiel has been consciously Indian in his sensibility. He is a great Indian poet writing in English without losing his national identity. Most of his poems give expression to his love of the soil in quite unequivocal terms. He affirms that he is very much an Indian and that his roots lie deep Indian. "I am not a Hindu and my background makes me a neutral outsider, circumstances and destiny relates me to India. In other country I am foreigner, in India. I am Indian''. Though Ezikel has not inherited the great classical tradition of Indian, of Vedas and Upanishads but to the extent he has availed himself to the composite culture of India to which he belongs. Nissim Ezekiel is also fully aware of the necessity of local knowledge to make the poetry authentic and live. The poet clearly knows and accepts that, "All my writing comes out of staying here. I am happy to be unhappy here rather than somewhere else. If I stay anywhere else, I will only be unhappy. Here, at least the unhappiness makes sense, unhappiness leads to critical perceptions."[2]**.** Perhaps this is one of the reasons why Ezekiel is graded as one of the most important poets of the second half of the 20th Century. According to Dr. Shaila Mahan, Ezekiel falls into a category of the poets who have stayed back in India. She divides the Indian poets writing in English into three broad categories: "Indian English poets may be divided into three groups. The first group comprises of poets who, after having lived for some years particularly during their formative years in the west, have returned to India. Ezekiel belongs to this category. The second category consists of those poets who have settled abroad. They have made their home in the west. In the last group come those poets who have never lived abroad for any substantial period."[3]

One cannot dwell into ethos of India sans involvement into the Indian scene. Nissim Ezekiel has essentially involved into the Indian scene. Makarand Paranjape regards that, "Nissim's poetry is no esoteric exercise with words, or an avenue of unrestrained emotional catharsis. Poetry to him is a communicative act, a discipline. This has made Nissim the most readable and consistent of the modern Indian English poets."[4]

The poem "Background Casually'' expresses Ezikiel's total commitment to India to Bombay and to poetry. As he is totally committee to his chosen profession so also he is committed to the country of his choice and to the city Bombay which he has made his home. He has become part and parcel of India. He has proud of his Indian environment. 'Background casually' epitomizes the consciousness of living in an imperfect, unromantic India, which characterizes the new poetry. Ironically, Ezekiel sees himself within the ambiguous perspectives of the inside–outsider. His Jewish–westernized – Indian background makes him a natural–outsider. He has expressed

unhappiness with his environment, without wanting to abandon or being liberated from it. However we find Ezekiel making an attempt especially in his later poetry, to understand India's past, its culture and relate himself to India.

Ezikiel kept his commitment by depicting life faithfully the finds it in the city of Bombay. His poetry acted as a mirror for reflecting life as it is actually lived in India Bombay is realistically and feelingly depicted in number of his poems.

Ezikiel is essentially a poet with a well marked Indian sensibility. His first hand knowledge of the Indian scene and his feelingly rendered it in a number of poems. In India is a well known poem of Ezekiel in this poem his treatment Indian life is characterized by down to earth realism. In 'The Song' the poet attracts our mind towards the Indian city life. The poet himself is a city dweller, dirty and misery, the exploitation and corruption which he witnessed everywhere in a city like Bombay.

In the very first part of the poetry, the poverty the squalor, the heart & ugliness of an Indian city is vividified.

"Always in the sun's eye"
Here among the beggars
Hawkers, Pavement, Sleepers

Suffer the place and time"

The second part of the poem talks about the secular state and the way religions live in India and particularly in Bombay which is the heart of India. The Poet wants to tell us that the Indian Roman Catholic,Anglo Indian and the Islamic peoples are earnest in their prayers but in a true sense they don't follow their religions. The following lines clear the idea.

''The Inglue-Indian gentlemen
Drank whisky is some Jewish den
With Muslims slowly creeping in
Before or after prayers''

The third party of the poem is characteristically blunt retire on the how status of women in India. They are treated as minor citizen while the men under western influence do what they please. The discriminatory treatment of the sexes is clearly brought out in the following lines in the celebration of the 31st Dec. party the Indian women.

"The wives of India sit apart
They don't to drink they do not talk
Of Coerce they do not kiss"

But the Indian men are quiet easily enjoy the party, dance, drinking and flirting also. The flirting is a luring which is allowed only to Indian men and not to women.

The last section of the poem provides and ironic contrast to the earliest remark of someone i.e. '' The atmosphere corrupt and looks at our wooden wives.'' The conflict of cultures is brilliantly and ironically depicted in the last movement where the English boss tries to seduce his Indian secretary and finds her blouse a happy hunting ground in contrast to the standard of Indian morality. The lines from the last action are suggestive. They suggest that the Indian secretary thinks that the English man will offer here all the attraction of Western culture. But lasts what she gets are his boorish lust which he tries to force on her.

In this way the whole poem is a presentation of pseudo-modern Indians leading fashionable lives in cities. The delineation of artificial and snobbery of the English boss and the Indian lady. The poem is ironic and truely representatives of certain class in Indian. It also gives in a vital sense of the Indian milieu, its traditions and cultures.

How truly Ezekiel describes the day to day domestic scene of average Indian couple in the poem 'To a Certain Lady': Then, absences and quarrels, indifference Sucking like a leech upon the flesh, Crude acceptance of the need for one another, Tasteless encounters in the dark, daily Companionship with neither love nor hate (CP, p.29) And again in a typical Indian English, he narrates the anguish of the husband troubled by the wife in the poem 'Song to be Shouted Out, from Songs for Nandu Bhende': Shout at me, woman! Pull me up for this and that. You're right and I'm wrong. This is not an excuse, It's only a song. It's good for my soul To be shouted at. Shout at me, woman! What else are wives for? (CP, p.242) In the simplest of language, he presents the attitude of the Indian female in the poem 'In India': The wives of India sit apart, They do not drink, They do not talk, Of course, they do not kiss. (CP, p.133) As far as material and content are concerned Ezekiel's poems are full of Indianess. A typical Indian atmosphere is found to prevail in the poems of Ezekiel. The Indian society, the Indian relationship between society and nature surprise the reader with their freshness of approach and observation. The persona's quarrel at the soap about the defective soap being given by the shop keeper is all hilariously Indian: Now small crowd is collecting And shop man is much bigger than me, And I am not caring too much For small defect in well-known brand soap. So I'm saying Alright OK Alright OK This time I will take But not next time. (CP, p.269) . The suffering of average Indian middle class is mentioned in the poem 'Occasion' wherein the typist is 'without a face or figure': The typist says goodnight, A south-Indian middle-aged balding man Without a face or figure. His name: Ramanathan or Krishnaswamy. (CP, p.277) Suffering from the humilities of everyday life many Indians everyday speaks the following language: I tell you, we should have left This country twenty years ago. Now it's too late. There's no future for us. (CP, p.277)

The poem 'At the Hotel' presents the hidden motives of average Indian: Our motives were concealed but clear, Not coffee but the Cuban dancer took us there, The naked Cuban dancer. On the dot she came and shook her breasts All over us and dropped The thin transparent skirt she wore. Was it not this for which we came? The noise, the smoke, the smell of flesh we relished Secretly and wanted more, We drank our coffee swiftly When the Cuban dancer left the floor, The naked Cuban dancer. (CP, p.112) 'Entertainment' shows an authentic Indian ness. It is a faithful description of a monkey-show which one can witness in any street corner of India. The reactions of the audiences are tellingly noted. They have an intuitive fore-knowledge of the time to pay: Anticipating time for payment The crowd dissolves, Some, in shame, part With the smallest coin they have, The show moves on. (CP, p.193) 195 And if it does not, the monkey and its master will have to starve to death. A usual roadside diversion provides the poet with an opportunity to offer his reflections on Indian social life at the meanest.

Another poem 'Nigh of the Scorpion' by Nissim Ezekiel with an Indian sensibility presents the whole picture of the rural area in India. The poem shows great love and affections of the Indian illiterate farmer for the poets mother their helpful nature, their superstitious beliefs are also presented in contrast with the scientific and sceptic way of treatment of the poets father.

'Night of the Scorpion' is regarded as one of the poems from rural background. According to M.K.Naik, "Night of the Scorpion' is generally taken to be an ironic presentation of the contrast between popular superstition and skeptical rationalism."[5] The poet successfully catches the belief system of various people in this poem. Very few Indian writers of English are successful in conveying indigenous speech rhythm, tone, colloquial nuances in English especially in the speech of peasants and petty merchants which figure in their works. The sentence structure deftly reflects the Indian experience and ethos: With every movement that the scorpion made His poison moved in mother's blood, they said. May he sit still they said. May the sins of your previous birth. Be burned away tonight, they said. May your suffering decrease The misfortunes of your next birth, they said. May the sum of evil Balanced in this unreal world Against the sum of good Become diminished by your pain. (CP, p.130) M.K.Naik finds out four distinct treatments to the poem in terms of the attitudes expressed: "Four distinct attitudes to these allied problems are sharply differentiated in the poem ('Night of the Scorpion'). The first is traditional, popular Indian (Hindu-Buddhist) view of it, which is a curious mixture of metaphysics, faith and superstition. Diametrically opposed to this view is that represented by the father, "skeptic, and rationalist." For him a scorpion bite is just a case for the employment of experimental medicine, "powder, mixture, herb and hybrid". He even pours a little paraffin on the bitten toe and puts a match on it."[6] The last stanza of 'Night of the Scorpion' is the very culmination of the sense

of sacrifice and vicarious suffering of the mother for her children: My mother only said Thank God the scorpion picked on me And spared my children. (CP, p.130) . These lines have rich cultural undertones typical of the orient and remotely typical of Hinduism. According to Shirish Chindhade, "… 'Night of the Scorpion' is obliquely about redemption of children achieved vicariously through the suffering of a scorpion stung mother…. A simply narrative poem in which the force of the superstition and age old beliefs is pitted against the modern skeptical temperament."[7]

डॉ. आंबेडकरांनी 1942 साली शेडयुलकास्ट फेडरेषन आणि स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली आणि दलितांच्या राजकारणातील प्रवेषाचा मार्ग आखून दिला. पुढे दलित राजकारण हे प्रामुख्याने जातीविरोधी राजकारणाचे केंद्र होत. स्वातंत्र्यानंतर डॉ. आंबेडकरांनी रिपब्लीकन पार्टी स्थापन करून प्रथमच दलित चळवळीला राजकीय क्षेत्रात आणले. त्यानंतर बऱ्याच काळाने उत्तरप्रदेषात कांषिराम यांनी दलित जातीतील नोकरीपेषा लोकांचे संघटन 'बामसेफ' या नावाने स्थापन करून दलित समाजाचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. डॉ. आंबेडकरांचा आइर्ष समोर ठेवून सरकारी नोकऱ्यातील जातीचे प्रमाण व आरक्षणाच्या संदर्भातील त्यांनी आपली धोरणे जाहीर केली. 1984 मध्ये त्यांनी बहुजन समाज पार्टी या नावाने राजकीय पक्ष स्थापन करून उत्तरप्रदेषाच्या राजकारणात पाय रोवले. या पक्षाला दलित व मागासवर्गीयांचा पक्ष म्हणून ओळख प्राप्त झाली. जमीन वाटपाच्या प्रष्नावर भर देऊन दलित राजकारण जातीच्या पलीकडे नेण्याचा प्रयत्न केला. 60 च्या दषकानंतर दलित चळवळीने चांगलाच जोर धरला होता; परंतु निवडणुकीचे राजकारण, त्यात आलेले अपयष आणि समाज परिवर्तनाला गती देण्याऐवजी राजकीय स्वार्थासाठी केलेला दलित चळवळीचा वापर यामुळे दलित चळवळीचे राजकारण अपयषी ठरले.

हिन्दुत्वाचे राजकारण :–

कॉग्रेसव्यवस्थेच पडझडीच्या काळात उदयाला आलेली हिंदूत्वाच्या राजकारणाच्या उदय झाला. गेल्या दोन दषकात भाजपची वाढलेली ताकद आणि 2014 च्या लोकसभा निवडणूकीत भाजपाच्या हाती आलेली केन्द्रसत्ता यामुळे हिन्दुत्ववादी राजकारणाचे स्थान आज महत्वपूर्ण बनले आहे. कॉगेसला पर्याय म्हणून उभे राहण्याचे भाजपने सातत्याने प्रयत्न केलेला आहे. सत्तरीच्या दषकात संघाने कर्मठ, सनातनी भूमिका बाजूला ठेवून आधुनिक हिन्दुत्वाचा पुरस्कार केला हिन्दूसारख्या विस्खळीत, विविधतापूर्ण आणि खंडप्रायः भूप्रदेषात परसरलेल्या जातिबध्द समाजाला राजकीय दृष्टया संघटीत करण्यासाठी हिन्दुत्व भावनिक आवाहन करणे. एक अखिल भारतीय समाज कल्पिण्याचा प्रकल्प हिन्दूत्वाच्या राजकारणातून पूढे येतो. त्यामाध्यमातून हिंदूचे एकीकरण करण्याचे प्रयत्न भाजप व संघपरिवार करणे भांडवली विकासातून एक फार मोठा पांढरपेषांचा समूह भारतात तयार झाला. भौतिक साधन सामग्रीवर नियंत्रण, त्या साधन सामग्रीचा अगदी अंषमात्र मालकी बौध्दिक यंत्रणावर हुकुमत कनिष्ठ वर्गियांबद्दल आपुलकिया अभाव ही या पांढरपेषया वर्गाची वैषिष्टये. या पांढरपेष्या मध्यमवर्गीय जातींमध्ये भाजपाचा प्रभाव फार मोठया प्रमाणात दिसून येतो. हिन्दूत्ववादी भूमिकाद्वारे मध्यमवर्गानी भावनिक गरज भाजपा पूर्ण करते. म्हणून भाजपचा उदय हा आक्रमक भांडवली विकास आणि मध्यम वर्गाचा विस्तार या घटनांच्या बरोबरीनेच होतो. या अर्थाने हिन्दूत्वाचे राजकारण मध्यमवर्गाचे राजकारण होय.

जागतिकीकरण, मध्यमवर्गाचा विस्तार व जातवास्तवः–

1991 नंतर भारतात खाऊजा धोरणाचा प्रारंभ झाला. या घटनेचे सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रांवर फार मोठा प्रभाव पडला. ज्या जातिंचा आधीच मध्यमवर्गात प्रवेष झालेला होता, स्थलांतर करून जी जात–कुटंबे शहरात वसली होती. व ज्यांनी इंग्रजी व तांत्रिक षिक्षण पूर्ण केले होते. अष्या जातवर्गासाठी जागतीकीकरणाचे धोरण लाभदायक ठरले त्यामुळे प्रत्येक जातीतील अल्पसावर्ग मध्यमवर्गात आला. हया प्रक्रियेत मध्यमवर्गाचा विस्तार होण्यास हातभार लागला. याकाळखंडात जातींचा सामाजिक व्यवहारामधील हस्तक्षेप वाढत गेला. जातींच्या आधारावर मतबॅक, बॅका, शळा–कालेज, वसाहती, विवाह व मित्रवर्गाचे जाळे आधारलेले आहे. आपआपल्या जातीच्या आधारावर जातींच्या संघटना व पक्षसुध्दा बांधण्यात येत आहे. विषिष्ट जातींचे हितसंबंध तयार होतांना दिसत आहे. नागरी, प्रादषिक व स्थानिक पातळीवर लोक जातीच्या आधारावरच एकत्र होतांना दिसतात. (उदा. ब्राम्हण जातींचे सम्मलने) जाट, गुज्जर, मराठा व धनगर या जाती आरक्षणाची मागणी का करित आहे? याचे उत्तर प्रत्येक जातीच्या जातीय हितसंबंधामध्ये मिळते.

या सर्व काळात जात नावाच्या घटकाभोवती एक दुहेरी प्रक्रिया घडत जाते. जात हि जणू काहि अपरिवर्तनीय, स्थिर स्वरूपाची सामाजिक रचना आहे, असे आपल्याला वाटत असते. कारण जातव्यवस्थेच्या जाचक व स्थितीवादी स्वरूपामुळे असे मत तयार होते. व त्यात काही अषे तत्थ्य हि आहे. परंतु स्वातंत्र्योत्तर भारतात जातीच्या अंतर्गत रचनेत अनेक बदल घडुन आलेले आढळतात. याला जषी नवीन आधुनिक व्यवस्था व त्यातील मुल्ये कारणीभूत होतील तसाच भागवली अर्थव्यवस्थेचा रेटा देखील कारणीभूत होता. ''एक व्यक्ति एक मत'' या तत्वाचा पुरस्कार करणारे भारतातील लोकषाही समान षिक्षणपध्दती, शहरीकरणाची प्रक्रीया इ. बाबीमुळे प्रत्येक जातीच्या अंतर्गत रचनेत अनेक बदल घडून आले.

भारतीय लोकशाही समोरील आव्हाने :–

संसदेचे अवमूल्यन :– भारतीय संविधानाने सांसदीय 'षासन पध्दतीचा स्विकार केला आहे. सांसदिय लोकषाहीच्या यषस्वीतेसाठी उच्च अषा संवैधानिक नितिमत्ता व जबाबदारीची जाणीव असणे आवष्यक आहे. सद्या स्थितीत संसदेत तज्ञ व बुध्दिजीवी वर्गाचा अभाव आढळून येतो संसद सदस्यांची अल्प उपस्थिती जनतेच्या भावनांषी प्रतारणा करण्यासारखी आहे. सभागृहातील वाढता गोंधळ चिंतेचा विषय झाला असून सार्वजनिक व राष्ट्रीय प्रष्नांची सोडवणूक करणे कठीण झाले आहे. अनेक राष्ट्रीहिताच्या

योजना आणि निर्णये प्रलंबित राहतात परिणामी संसदेची प्रतिष्ठा आणि नितिनियमांचे अवमूल्यन होत आहे. उज्वल लोकषाहीच्या प्रस्थापनेसाठी ही बाब अतिषय क्लेषदायक आहे. अधिवेषन काळातील गोंधळामुळे सभागृह बरेचदा तहकुब करावे लागते त्यामुळे पेषाच्या अपव्यय होते. राजकारणातील वाढती गुन्हेगारी लोकषाही समोरील मुख्य प्रष्न बनला अहे. राजकीय पक्षांनी उमेद्वार निष्चित करतांना उमेद्वाराचे चारित्र्याची व पार्ष्वभूमिची तपासणी करावी. राष्ट्रहितापेक्षा पक्षहित जोपासणारे खासदार मोठया प्रमाणात असल्याने संसदेच्या कामकाजात अडथळा निर्माण होतो. संसदेचे पावित्र्य, प्रतिष्ठा आणि महत्व टिकविण्यासाठी व लोकषाहीची खरी मुल्ये रूजविण्यासाठी संसद सदस्याने जबाबदारीचे दायित्व पत्करले पाहीजे.

आघाडयांचे राजकारण :– नव्वदी नंतरच्या भारताच्या राजकारणाचे वैषिष्टय म्हणजे एकपक्षीय सरकारे इतिहास जमा झाली आणि आघाडीच्या 'शासनाची सुरवात झाली. एका पक्षाच्या भष्ट्र आणि अकार्यक्षम 'षासनाला संधी देण्यापेक्षा अनेक पक्षाच्या आघाडी सरकारचा पर्याय उचित आहे हा पर्याय समोर आला मात्र आघाडयांच राजकारणामूळे राजकीय तडजोडी निर्माण होते. पक्षाची धारणे आणि विचारप्रणाली यांचे महत्व कमी होते आणि स्थैर्यषील 'षासन निर्माण होण्यास अडचणी निर्माण होतांना दिसत आहे. निव्वळ सत्ताप्राप्तीचा उद्देष निर्माण होऊन लोकषाही मूल्यांची गळचेपी होतांना आढळत आहे. आघाडीच्या 'षासनामूळे संसदिय लोकषाही मूल्यांमधील संयुक्त जबाबतदारीच्या तत्वात बदल होऊल 'सामूहिक' पेक्षा अधिकाधिक 'वैयक्तिक' स्वरूप येत आहे. लोकषाहीच्या मजबूतीच्या दृष्टीने आघाडीचे 'षासन भविष्यात उपयुक्त ठरेल असे वाटत नाही.

लोकषाहीतील राजकीय घराणेषाही :– भारतातील सर्व पक्षामध्ये राजकीय घराणेषहीची किड लागली आहे. निवडणूकीत पैसा आणि घराणेषाहीच्या बळावर विजय प्राप्त होत असला. तरी वर्षानुवर्षे पक्षासाठी कार्य करणाऱ्या सामान्य कार्यकर्त्याची उपेक्षा होते त्यामूळे त्यांच्या राजकीय व्यवस्थेवरील विष्वास उडत चालला आहे. प्रत्येक पक्षात विद्वान, अनुभवी आणि पक्षनिष्ठ नेते आहेत मात्र राजकीय वारसा अभावी सत्तापक्षा पासून कोसो दूर आहेत. राजकारण हा वंषपरंपरागत व्यवसाय बनला आहे. निकोप लोकषाहीच्या भविष्यासाठी राजकीय घराणेषाही अडसर ठरत आहे.

गटबाजी आणि दिषाहीन राजकारण :– भारतातील विषिष्ट परिस्थिती आणि निरनिराळया क्षेत्रात तसेच प्रदेषात आढळून येणाऱ्या विविधतेमूळे अनेक पक्षाचा उदय झाला. अनेक पक्षाच्या अस्तितवामूळे भारताच्या संसदिय 'षासन पध्दतीसाठी काही अडचणी निर्माण झाल्यामूळे विचारसारणी सोडून दिषाहीन वागल्याने पक्षाअंतर्गत आता अस्थिरता सर्वच पक्षात आढळून येत आहे. सत्ताप्राप्तीच्या तडजोडीसाठी विचारसारणीला तिलांजली देण्यास पक्ष मागेपूढे पाहात नाही, 52 व्या घटनादुरूस्तीद्वारा पक्षांतर बंदी विधेयक कायदा पास करण्यात आला मात्र त्याचा फारसा फायदा झाला नाही. पक्षांतरामुळे राजकीय अस्थिरता निर्माण होतांना दिसत आहे.

अत्यल्प मतदानाची टक्केवारी आणि निवडणूकीतील भष्ट्राचार :– आतापर्यंत निवडणूकीतील एकूण मतदानाचा आढावा घेतला तर जनतेचा राजकीय सहभाग दिवसेंदिवस कमी होत आहे. एकुण मताची टक्केवारी कमी होतांना दिसते. सार्वजनिक निवडणूकीत 50 ते 60 टक्के मतदान होते. बहुपक्ष पध्दतीमुळे रिंगणात अनेक पक्षाचे उमेद्वार असतात. साध्या बहुमताच्या निर्वाचन पध्दतीमुळे 15 ते 20 टक्के मतदान प्राप्त करणारा उमेद्वार निवडून येतो. मात्र या विजयी उमेद्वारा विरूध्द 80 ते 85 टक्के मतदार आहे तरी तो त्या मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करतो. हे लोकषाहीच्या तत्वाला व प्रौढमताधिकाराच्या तत्वाला अपेक्षित आहे काय? हा लोकषाहीच्या वाढीला मारक ठरत आहे. राज्यस्तरीय भष्ट्राचार स्थानिक स्तरापर्यंत पोहचला आहे. सामान्य नागरीकांचा या भष्ट्राचारामुळे विष्वास उडाला आहे. मतदानाकरिता होत असलेल्या पैषाचा गैरवापर आणि मते विकणारा मतदार जर उमेद्वाराचा विजय निष्चित करत असेल तर ती लोकषाही परिपक्व म्हणावी काय? असंगत झालेली निवडणूक प्रक्रिय विधेयकाबाबत अनास्था लोकप्रतिनिधीसाठी नसलेली 'शैक्षणिक अट, दिषाहीन राजकारण, दबावगटे, ध्येयापासून दूर गेलेले राजकीय पक्ष, खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत न पोहचलेल्या 'षासनाच्या योजना, असुरक्षिततेची भावना नौकरषाहीचा वाढता दबाब,

दिषाहीन लोकप्रतिनिधी आणि नेतृत्व इत्यादी विविध घटकामुळे लोकषाहीचे भवितव्य धोक्यात येत आहे. नानाविधप्रकारे भारतिय लोकषाहीतील स्थित्यंतरे निकोप लोकषाहीच्या निर्मितीसाठी अडसर ठरत आहे. याचा विचार होणे महत्वाचे ठरते

समारोप :– स्वातंत्र्यानंतर पारंपारिक जातीव्यवस्थेचे जे ढोबळ प्रारूप होते. त्यात आमूलाग्र बदल झालेला दिसून येतो. प्रामुख्याने जात व व्यवसायचे अभिन्न संबंधी बदललेले दिसते आधुनिक काळखंडात जातीमध्ये व्यवसायीक लवचीकता दिसून येते. आधुनिक औद्योगिक समाजात जातीबध्द व्यवसाय व व्यवसाय बंदी या दोन्ही बाबींचे अस्तित्व क्षीण होत जाते. पण कनिष्ठ समाजाच्या जातींचे प्रतिनिधीत्व अजूनही उच्च व्यावसायीक क्षेत्रात कमीच असल्याचे दिसते.

षिक्षणाच्या सुविधांचा विस्तार झाला असला तरी सर्व जातीमध्ये षिक्षण प्रसाराचे प्रमाण सारखे नाही आधुनिक सामाजाची गरज म्हणून पदवीचे षिक्षण जरी बरेच जण घेत असले तरी वैद्यकिय, अभियांत्रिकी, वकिल, इतर पांढरपेषे, कुषल व्यवसाय यामध्ये कनिष्ठ जाती आणि दलित जाती यांचे प्रमाण फारसे नसते. ज्या जातींनी षिक्षण महत्वाचे मानले त्यांच्या बाबतीत जात–व्यवसाय यांचे परंपरागत सबंध सैल झाल्याचे दिसते. शहरीकरण, उद्योगक्षेत्राचा विस्तार, नवे व्यवसाय यांच्या जोडीने षिक्षण प्रसार व राजकीय जागृति झाल्यामुळे प्रत्येक जातीत अंतर्गत स्तरीकरण निर्माण झाले. जात्यांतर्गत स्तरीकरणाचे प्रमाण जेवढे अधिक असेल तेवढी ती जात व तिचे आर्थिक हितसंबंध विस्कळीत होत जातात. भांडवलषाहीच्या विस्तारामुळे जातीव्यवस्था दुबळी होईल आणि जागतीकीकरणाच्या रेटयामुळे तिला धक्का पोचेल असे अनेकांना वाटते परंतु भांडवलषाहीत उच्च जातींना व्यवसायांतर करणे सुलभ होते यात कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातींवर काही संकटे कोसळतात ज्या जातींकडे तुटपूंजी साधनसामग्री असते त्यामुळे उत्पादन व्यवस्थेत आणि बाजाराच्या रचनेत बदल झाले कि या जाती देषोधडीला लागण्याची शक्यता बळावते, म्हणून त्यांच्या भांडवलषाहीत होणारा समावेष हा मजूर, अर्धरोजगार किंवा भणंग–उपरे म्हणूनच होणार असे दिसते.

संदर्भग्रंथ सूची

1) रजनी कोठारी, 'भारत मे राजनिती' अनुवादक व संपादक अभयकुमार दुबे, वाणी प्रकाषन सी.एस.डी.एस. नई दिल्ली.

2) योगेन्द्र यादव, सुहास पळषीकर, पीटर डिसूझा, 'लोकषाही जिन्दाबाद', अनुवादक – मनोहर सोनवने, समकालिन प्रकाषन, पुणे.

3) यषवंत सुमंत, 'भारतीय लोकषाहीचे चर्चाविष्व : काही निरिक्षणे', विचारमंथन संषोधन पत्रीका, जानेवारी 2013 अंक 18, अथर्व पब्लिकेषन, जळगाव

4) सुहास पळषीकर, राजेन्द्र व्होरा, 'Indian Democracy : Meaning & Practices' अनुवाद, चित्रा लेले.

5) रामचंद्र गुहा, 'भारत नेहरू के बाद

6) राजीव भार्गव, अषोक आचार्य 'राजकीय सिध्दांत परिचय' अनुवादक – हेमंत खानझोडे, Published by 'Dorling Kindersley' (India) Pvt. Ltd, New Delhi

7) धीरूभाई 'शेठ 'नये मध्यमवर्ग का उदय', संकलीत, अभयकुमार दुबे (सं), वाणी प्रकाषन, नई दिल्ली,

8) जावीद आलम 'हू वान्ट्स डेमोक्रेसी' चे अनुवाद 'लोकतंत्र के तलबगार' अनुवादक – अभयकुमार दुबे, वाणी प्रकाषन, नई दिल्ली,

9) सुहास पळषीकर, समकालीन भारतीया राजकारण कॉग्रेस वर्चस्व ते हिंदू वर्चस्वाद, प्रति प्रकाषन.

10) सुधा पाई, 'वंचित वर्ग का बहिष्कार और हाषिये कि स्थिती', योजना मासिक, ऑगस्ट 2013,

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
with
International Impact Factor 2.254

ISSN No. 2394-8426
Dec – 2015
Issue – I, Volume – V
Online Journal

यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांचे निर्णय प्रक्रियेतील स्थान

शुभांगी अ. भोयर,
एम.ए. बी.एड., एम.फील., गृहअर्थशास्त्र,
रां. तु.म.नागपूर विद्यापीठ
डॉ.सौ. अपर्णा ढोबळे,
सहाय्यक प्राध्यापक,
विभाग प्रमुख, गृह विज्ञान,
सेवादल महिला महाविद्यालय व संशोधन अकादमी, नागपूर

प्रस्ताव- आदिवासी समाजाच्या सामाजिक संघटनेचा विचार करीत असताना स्त्रियांचा दर्जा व स्थानांचा अभ्यास लक्षणीय ठरतो. आदिवासी समाजात स्त्रियांना प्रदान केलेले अधिकार व स्थान निश्चित करता येतात.

आदिवासी समाजातील स्त्रियांचा दर्जा निश्चित करण्याकरिता त्या समाजातील स्त्री व पुरुषांचे अधिकार कोणते या बाबींचा अभ्यास करूनच निष्कर्ष काढता येतात .

1. स्त्रियांना मिळणारी प्रत्यक्ष वागणूक .
2. स्त्रियांना मिळणारी सामाजिक संधी .
3. स्त्रियांचा कायदेशीर दर्जा

यां निकषावर स्त्रियांचे स्थान निश्चित केले जाते

आदिवासी समाजात आर्थिक कार्यावरच लोकांचा उदरनिर्वाह चालत असतो. आर्थिक क्रियांमध्ये स्त्रियांचा सहयोग मोठ्या प्रमाणावर असेल तर स्त्रीयांच्या कामाचे महत्त्व वाटते.

आदिवासी समाजात स्त्रियांचे निर्णय प्रक्रियेत सहभाग हा सुद्धा खूप महत्त्वाचा भाग आहे. याकरिता त्या समाजातील स्त्रियांच्या गृहव्यवस्थापन व कामाच्या पद्धतीवर त्या स्त्रियांचे स्थान निश्चित होते.

निर्णय प्रक्रिया - निर्णय ही एक प्रक्रिया आहे. मनुष्य आपल्या जीवनात अनेक निर्णय घेतात निर्णयाचे काही प्रकार आहे जसे वैयक्तिक निर्णय, सामूहिक निर्णय, बौद्धिक निर्णय या निर्णय पद्धतीवरच निर्णय प्रक्रिया अवलंबून असते.

उद्देश -

1. स्त्रियांच्या निर्णय प्रकाराचा उद्देशानुसार

2. स्त्रियांच्या जबाबदारी विषयक उद्देशानुसार

गृहीत कृत्य – निर्णय प्रक्रियेचा व जबाबदारीचा स्त्रियांवर परिणाम होतो.

नमुना निवड - सर्वेक्षणा करिता यवतमाळ जिल्ह्यातील, मालेगाव तालुक्यातील विविध वयोगटातील स्त्रियांची निवड केली व निर्णय प्रक्रियेतील सहभाग किती असतो हे जाणून घेतले.

चर्चा विश्लेषण - प्रस्तुत संशोधनात मारेगाव तालुक्यातील आदिवासी स्त्रियांच्या निर्णय प्रक्रिया व जबाबदारी मध्ये स्थान कशा पद्धतीने आहे याकरिता 50 स्त्रियांची निवड केली व टक्केवारी पद्धतीने विश्लेषण केले.

1. आदिवासी स्त्रियांचा वयोगट दर्शक तक्ता

वय	21 ते 30	31 ते 40	41 ते 50	50 चे वर	एकूण
संख्या	9	13	21	7	50
प्र. श. क्रमांक	18%`	26%	42%	14%	100%

सर्वेक्षण करिता नमुना म्हणून 50 स्त्रियांचा विचार करण्यात आला .

2. आदिवासी कुटूंबाचा प्रकार दर्शक तक्ता

प्रकार	संयुक्त	विभक्त	एकूण
संख्या	18	32	50
प्र. श. क्रमांक	36%	64%	100%

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की संयुक्त कुटुंब पद्धतीपेक्षा विभक्त कुटुंब पद्धती जास्त आहे .

3. आदिवासी स्त्रियांच्या महत्त्वाचे निर्णय घेण्याविषयी तक्ता

विवरण	समूहाने	वैयक्तिक	अनुभवाने	एकूण
संख्या	21	18	11	50
प्र. श. क्रमांक	42%	36%	22%	100%

वरील सारणी वरून 50 पैकी समूहाने निर्णय घेणाऱ्या 42% स्त्रिया आहेत तर वैयक्तिक निर्णय घेणाऱ्या 36% आहे तर 22% स्त्रिया अनुभवाने निर्णय घेतात. जास्तीत जास्त स्त्रिया समूहाने निर्णय घेतात असे दिसून येते .

4. कामाची आखणी/नियोजन यशस्वी घेण्यासाठी घरातील मदतनिस

विवरण	स्वतः	पती	सासू	सासरे	एकूण
संख्या	30	15	3	2	50
प्र. श. क्रमांक	60%	30%	6%	4%	100%

वरील सारणीत स्वतः नियोजन यशस्वी करण्यात सहभागी असलेल्या असे सांगताना स्वतः 60% स्त्रिया आढळल्या .

5. आदिवासी स्त्रीयांच्या घरातील सर्व कार्यावर नियंत्रण तक्ता

विवरण	कामाची विभागणी करून	सर्वांना कामासाठी प्रोत्साहित करते	स्वतः कार्य करून	कोणाचीही देखरेख नसते	एकूण
संख्या	8	10	30	2	50
प्र. श. क्रमांक	4%	20%	60%	4%	100

					%

वरील सारणी वरून स्वतःहा कार्य करून कार्यावर नियंत्रण ठेवतात अशा सांगणाऱ्या 60% आदिवासी स्त्रिया आढळून आल्या .

निष्कर्ष - प्रस्तुत लघुशोध निबंधात 50 आदिवासी स्त्रियांचा विचार करण्यात आला व निर्णय प्रक्रियेमध्ये नियोजन, नियंत्रण व जबाबदारी या प्रक्रियेद्वारे यांची माहिती संकलित करण्यात आली. निर्णय घेताना समूहाने निर्णय घेणाऱ्या 21 (42%) स्त्रिया जास्त आढळून आल्या व घरातील जबाबदारी व नियोजन यशस्वी होण्याकरिता स्वतःहा जबाबदार आहे असे सांगणाऱ्या 30 (60%) स्त्रिया जास्त आढळून आला तर कार्यावर नियंत्रण ठेवण्याकरिता स्वतः कार्य करून नियंत्रण ठेवतो अशा सांगणाऱ्या 30 (60%) स्त्रिया आढळून आल्या.

वरील लघुशोध निबंधात असे आढळून आले की सर्व स्त्रिया घरातील निर्णय प्रक्रियेत नियोजन नियंत्रण करण्यात स्वतःहा पुढाकार घेतात पण निर्णय हा समूहाने घेऊनच कार्य केले जाते म्हणजे सामूहिक निर्णय प्रक्रिया ही यशस्वी प्रक्रिया असू शकते.

संदर्भसूची:

1. सामाजिक मानसशास्त्र, मंगेश प्रकाशन, रामदास पेठ नागपूर, खडसे डॉ. भा. की.1999
2. शिरोळे डॉ. धैर्यशील 2002 आदिवासी कथा व व्यथा
3. गृहअर्थशास्त्र - पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिकेशन्स, नागपूर, फेब्रुवारी 1990 प्रा. डॉ. श्री. भाग्यलक्ष्मी, प्रा. डॉ. नंदनी
4. Home management and family housing, sheth publishers Private Limited Mumbai July 2007
5. आधुनिक गृह व्यवस्थापन आणि गृहसजावट, पब्लिशर्स अंड डिस्ट्रीब्यूटर, नागपुर 2004 डॉ. सौ.कोल्हेटकर विद्या

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
with
International Impact Factor 2.254

ISSN No. 2394-8426
Dec – 2015
Issue – I, Volume – V
Online Journal

Analytical Study of Impact of Cultural Factors on the Consumer Behaviors

Raju Dhabale
Assistant Professor
Ashok Moharkar Arts and Commerce College
Adyal, Dist., Bhandara

Abstract :
Consumer behaviour is the study of individuals, group of individuals and organizations. It includes all the aspects that are associated with the consumer, such as buying behaviour, use and disposal of goods and services, including the consumer's emotional, mental and social angles that precede or follow these activities. In order to succeed in today's dynamic and rapidly evolving marketplace, marketers need to know everything about consumers - what they need, what they think, how they work, how they spend their money and time. The culture of any region is impacting on the consumer buying behaviour. Thus researcher had studied the impact of cultural factors on the consumer behaviour.

Keywords: culture, consumer behavior, cultural factors.

Introduction :

Consumer behavior is largely dependent on cultural factors consisting of mutually shared operating procedures, unstated assumptions, tools, norms values, standards for perceiving, believing, evaluating and communicating. Cultural factors vary by country or region but become increasingly complex when people immigrate to foreign countries or other region that have different cultural dimensions.

In the process of globalization of a business, one thing is important that is the need to connect with the customer. A consumer is more than just an asset for a company; he is a parameter through which that company can instrument its success in a market. This is the reason understanding consumer behaviour is so important—and the factors which shape this behaviour are even more so.

The thing which highly affects the way a consumer behaves is culture.

A society's culture is a echo of its traditions, norms, values, and customs. The shopping habits of individuals are particularly shaped by these factors. To define a consumer behaviour would be analogous to defining an umbrella concept of many factors. Consumer behaviour depends on attitudes, motives, experiences, perceptions, values, self-concept, culture, family, profession, and reference groups of society. Not surprisingly, a change in any of these would cause a change in consumer behaviour too.

While it is a well-known fact that a marketer is able to control the consumer buying behaviour, the reality is far away from that. A marketer can indeed attract the buyers, but he cannot control them as other factors affect the choices they make. These choices, on the other hand, are dependent upon extrinsic factors such as culture.

Consumer Behaviour

The buying behaviour process used by consumer in the market before, during and after the purchase of goods and services. It starts with need recognition and end with the post purchase Behaviour of consumers. In this process the consumer also looks at the cost-benefit analysis.

1. Need Recognition The decision of buying goods and services starts with the recognizing the need or desire which a consumer wants to satisfy. The intensity of need decides the priority list of the consumer. The consumer will make an immediate purchase of those goods which are most urgent for consumer and postpone the other need or desire.
2. Information Search The need recognized in the first stage can be satisfied when the consumer knows what product can satisfy that need and availability of that product. For this purpose the consumer look for the information from various sources such as family, friends, advertisement, media etc.
3. Evaluation of Alternatives The consumer assesses various alternatives products and services to satisfy their needs. In evaluating process the consumer look at various aspects of products and services in the form of features, utility, brand image and post purchase services. The criteria to evaluate the product differ on the situation and the involvement of the consumer. Sometimes, the sales representatives also help the consumers to evaluate the product and services.
4. Purchase Decision After evaluating all the alternatives the purchase of particular brand depends on the evaluation criteria and ranking. It also depends on the availability of the brand and affordability of consumer. Consumers are not certain about the purchase outcome as they hesitate to take risks. The marketers should help the consumer by reducing risk factor and providing them sufficient information about products and services in decision making process.
5. Post-Purchase Behaviour The consumer always evaluates the performance of the product. The consumer will be either satisfied or dissatisfied after the evaluation. If the product performance will meet the consumer expectation, consumers will repeat the purchase. The buyer will talk positively about the product. On the other hand, if performance didn't meet expectation the consumer will stop buying the product. This will result into negative publicity of the product.

Effect of Culture on Consumers

To define the culture of a nation, it is imperative to first examine the belief system and values of the people residing there. A culture can be defined as the total average of beliefs, values, and traditions that are directly linked to the consumer behaviour of members of a specific society. Generally, both beliefs and values are mental images that affect particular attitudes which, consequently, variates the methods a person uses to make choices in brands and services. For example, a product category like "Audi vs Volvo" would entail customers choosing from among these alternatives, and his preference of a brand over the other will be affected by his common values and beliefs. In contrast to values and beliefs, traditions are habits and suitable ways of behaving, whereas the former is just rules of behaviour. An example is the addition of ketchup on an omelette and the preference of green tea over milk tea.

Culture determines the consumer's experiences, beliefs, and values, which in turn is directly linked to attitudes, emotions, social norms, intentions, and behaviours. Personal culture represents the local area. For instance, the people residing in several states in a specific area of South America have similar cultural habits. Religious differences or similarities, on the other hand, are backed by aspects like common core values, personalities, and customs, etc. Groups that influence the choice of consumers are typically sorted into workgroups, shopping groups, friendship groups, and families.

Cultural Factors :



1. **Culture:** The culture refers to the beliefs, customs, rituals and practice that a particular group of people follows. As a child grows, he inculcates the buying and decision-making patterns through his family and the key institutions. The culture varies from region to region and even from country to country. Such as the sale of "sarees" and "Lungis" is more in South than the North India. Therefore, the marketer should carefully study all the different cultures and frame the marketing strategies accordingly.
2. **Subculture**: The culture can be further divided into subculture wherein the people are classified more specifically on the basis of their shared customs and beliefs, including religions, geographic regions, nationalities, etc. The different sub-cultures forms several market segments whose needs can be carefully studied by the marketer, and the strategic marketing decisions can be taken accordingly. Such as the needs of the people living in metro cities and the ones living in B-grade cities must be identified before the launch of the marketing campaign.
3. **Social Class**: The social class to which an individual belongs influences the buying decision. Generally, the people belonging to the same class are said to be sharing the similar interest, value and the behaviour. Our society is classified into three social classes upper class, middle class, and the lower class. The consumers belonging to these classes possess different buying behaviours. Such as an individual belonging to the upper class buy those products or services that advocate his status while the lower class people buy those products which satisfy their basic needs.

These are some of the cultural factors that influence the individual buying behavior due to his membership in the group where different customs, practices, beliefs, and rituals are followed.

Cultural Factors Affecting Consumer Behaviour

Consumers have largely contributed to the growth of various businesses. This is because every successful business venture requires potential buyers. As a result, the role of the consumer on business prosperity can never be neglected. It is sad to mention that many businesses have closed due to lack of consumption of their products. However, other businesses have prospered due to the availability of more consumer of their products than they can even contain. Therefore, this paper attempts to define consumer behaviour. Although there are other factors such as personal, psychological and social factors that affect consumer behaviour, this paper will concentrate on cultural factors only.

Consumer behaviour can be defined as, "the behaviour that consumers display in searching for, purchasing, using, evaluating and disposing of products and services that they expect will satisfy their needs" (Schiffman & Kanuk, 2007: 13). However, there is another description of consumer behaviour as the mental and physical activities undertaken by households and organizational consumers that

results in decisions and actions to pay for, purchase and the use of the product and service (Sheth, Mittal & Newman1999).

There are two levels of consumer behaviour; the personal consumer and organizational consumer. The personal consumer is usually the one that buys products for personal use (Schiffman & Kanuk 2004). On the contrary, organizational consumers are described as the consumers who buy good and service to run their organization, for instance, the government organizations (Hawkins et al. 2001).

Culture is defined as a way of life. Therefore culture contributes much to the behaviour of the individual (in this case, consumer) even though people rarely understand their own culture. The characteristics of culture are adaptive, dynamic and patterned blueprints which can be interpreted to help the individual behave in a manner that is acceptable to the rest of the members of that culture. The myths, values, symbols and ritual have helped in defining the culture and using them may help in determining the consumer behaviour (Arnould et al. 2004).

Consumer behaviours are studied mainly because the behaviour of the consumer can never be predicted by the marketing theory. Therefore many consumers have unique requirements on the product and service and it is of important value that consumer behaviours are clearly understood.

Some of the cultural factors that affect consumer behaviour are outlined as follows; culture, subculture and social class.

Culture, as it has been indicated earlier has a significant effect on the behaviour of the consumer. There are different cultures among countries of the world therefore the marketers have to study the culture of the potential consumer before they offer the goods and services for sell. For instance, various studies have indicated that culture affects the behaviour of the consumer in buying of the good and service i.e. it has affected the decision of the consumer on buying, culture has greatly influenced diverse age group of the consumer in buying of the cosmetic and skincare product and finally the decision of the consumer in buying of the cosmetic and product is affected by the lifestyle factors (Chouten & Alexander 1995).

Subculture arises from the culture since all the cultures found in the world have got different subcultures such as nationality, religion, racial, gender or geographical region. For example, recent studies have established that men are increasingly using skincare products. Due to this fact, it was reported that sales of male grooming products went up by 18% in the whole world during the period 2006 to 2011 while the market was estimated to be of value $25 billion (Mermelstein & Fielding, 2007).

Religion can never be underestimated in understanding consumer behaviour since it is considered a long time phenomenon (Kim et al., 2004). It is an important cultural factor that influences values, attitude and behaviour of the consumer. For example, religion can provide restrictions about the use of cosmetic and skin care product.

Another example is that countries found in Asia have a large market of the cosmetic and skincare product therefore the manufacturer should study the culture of these countries to meet the needs of the consumer.

The last example on subculture is based on the gender. According to various studies that have been carried out, it has been established that more women are a potential consumer of cosmetics and skincare product as compared to the number of men who use the same products.

Social class is defined as, "the status hierarchy by which groups and individuals are classified based on esteem and prestige" (Webster 1992: 23). According to Warner, he defined the social class as "a group of individuals who other members of the community see as equal in social prestige and whom others believe to be superior or inferior to other groups that constitute the social classes below them or above them".

Generally, there are three different types of social class. First, there is an upper class which is subdivided into upper-upper and lower-upper. Second, there is the middle class which is subdivided into upper-middle and lower-middle. Finally, there is a lower class which is subdivided into upper-lower and lower-lower.

Conclusion :

The world of today is becoming more globalized everyday, but it cannot be denied that people all over the globe have the same needs and wishes, which is why it becomes easier for companies to produce the same items for diverse regions. However, strong differences still remain among the sets that consumers make according to cultural backgrounds. Companies must understand these differences, especially if they are aiming to sell products for the first time in a region or country. Understanding these differences is the key to making sure a firm is able to gain sound returns from its investments in markets, in addition to making profits for their company.

Consumer behaviour is important for the prosperity of the business. So it is of significant value to study the trends in the behaviour of the consumer towards the buying of the product and service. Also, it is worth to analyze the factors which affect the behaviour of the consumer since the consumer has a great contribution to the business. Without understanding the cultural factors that impact on their buying behaviour, the marketers may not understand the needs of the customers and hence fail to provide quality. Therefore, understanding of cultural factors affecting consumer behaviour will help the business in fulfilling the desires of the consumer and consequently turn the business into a successful venture.

References

- Arnould, E. and Price, L., 2004. River Magic: Extraordinary Experience and the Extended Service Encounter, Journal of Consumer Research, 20(1), pp. 24-45.
- Ali Syed Azher, FACTORS INFLUENCING CONSUMER BUYING BEHAVIOUR: A REVIEW, Pune Research World, An International Journal of Interdisciplinary Studies, Vol. 1, Issue 1, ISSN 2455-359X, www.puneresearch.com/word.
- Schouten, J.W. & Alexander, J.H., 1995. Subcultures of Consumption: Ethnography of the New Bikers. Journal of Consumer Research 22 (June), pp. 43-61.
- Durmaz, Yakup & Mücahit, Dr & Reyhan, Oruc. (2011). The Impact of Cultural Factors on the Consumer Buying Behaviors Examined through An Impirical Study. International Journal of Business and Social Science. 2.
- Hawkins, D. I., Best, R. J., and Coney, K. A., 2001. Consumer Behavior: Building Marketing Strategy. 6th edition. Published by Irwin McGraw-Hill.

- Kim, S. F., David, S. W., and Zafer, B. E., 2004. The influence of religion on attitudes towards the advertising of controversial products. European Journal of Marketing 38(5/6), pp. 537-555.
- Rani Pinki, Factors influencing consumer behavior, Excellent Publishers, http://www.ijcrar.com/vol-2-9/Pinki%20Rani.pdf 2014

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
with
International Impact Factor 2.254

ISSN No. 2394-8426
Dec – 2015
Issue – I, Volume – V
Online Journal

मराठी भाषा संवर्धन : काही उपाय

प्रा. मिलिंद साठे
सा. व्याख्याता मराठी
डॉ. ह. आ. कला–वाणिज्य महाविद्यालय, सावनेर
चलभाष : 9422823365

मराठी भाषा संवर्धनाच्या प्रश्नाबाबत पुरेशी चर्चा झाली आहे. काळाच्या ओघात तिचे सत्त्व, शुद्धरूप, प्रतिष्ठा टिकून राहावी याबाबत कुठलेही दुमत असण्याचे कारण नाही. हा प्रश्न अनेक व्यक्तींना त्रस्त करीत असला तरी ठोस असा उपाया करता आला नाही हे मराठी माणसाचे राजकीय आणि सांस्कृतिक पातळीवरील अपयश आहे.

मराठी भाषा उपजत समृद्ध आहे. तिच्यात ज्ञान, व्यवहार, विज्ञान, संस्कृती सामावून घेण्याचे सामर्थ्य आहे. याचे दाखले मुकुंदराज ज्ञानेश्वर, चक्रधर, नागदेवाचार्यापासून तर कुसुमाग्रज, सुरेश भटापर्यंत मोठ्या आत्मीयतेने दिले आहे.पुढेही ही परंपरा चालत राहील. मग मराठी भाषेच्या अस्तित्वाचा प्रश्न का निर्माण व्हावा? की काळजीपोटी भविष्याचा वेध घेवून केलेली ही तडजोड आहे? की खरेच आधुनिक युगात भाषांबाबत जटील प्रश्न निर्माण झाले आहेत? की त्या बाबतीतील सजगता म्हणून आपली भाषा टिकवून ठेवण्यासाठी प्रामाणिकपणे वाटणारी ही काळजी आहे? कारण कोणतेही असो, आधुनिक युगात आपली भाषा टिकवून ठेवण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे सत्य कुणालाही नाकारता येणार नाही. भविष्याचा वेध घेणाऱ्या द्रष्ट्या विचारवंतांना याचा अदमास घेता आला असावा म्हणून तर स्वतंत्र मराठी राज्य निर्माण झाले तेव्हापासून या प्रश्नाची कमी–अधिक चर्चा झाली आहे.

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी इंग्रजीची संभावना 'वाघिणीचे दूध'[1] अशी केली आहे. त्या मागचे कारण इंग्रजी भाषेचा जागतिक पातळीवरील वाढता प्रभाव व ज्ञानभांडाराचे प्रचंड स्त्रोत हे होय. इंग्रजी भाषा ही आधुनिक विज्ञान, व्यवहार आणि व्यक्तिप्रतिष्ठेचा गौरव करणाऱ्या संस्कृतीचे माध्यम होय. या भाषेतून आधुनिक जगाचा मागोवा घेता येतो. म्हणूनच म.द. हातकणंगलेकर यांनी, ''इंग्रजी ही जगाकडे दृष्टिक्षेप टाकण्याची खिडकी होती. आजही आहे.''[2] असे स्पष्टपणे नमूद केले आहे. जागतिकीकरणातील ही भाषा संघर्षाची नांदी होती याकडे काहीसे दुर्लक्ष करून मराठी भाषा टिकण्याची व तिच्या समृद्धीची चर्चा करण्यात आली.

भाषिक प्रांत रचनेनुसार 1 मे 1960 रोजी मराठी भाषिक राज्याची म्हणजे महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. त्यावेळचे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी 'हे राज्य मराठी असेल' अशी गर्जना केली होती. याचा अर्थ फक्त महाराष्ट्राच्या भौगोलिक निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या सर्व घटकांवर लक्ष केंद्रित करणे असा होता. याकडे राजकारण्यांचे, समाजकारण्यांचे, साहित्यिकांचे व सर्वसामान्य मराठी माणसांचे पूर्णतः दुर्लक्ष झाले. मराठी भाषेला राजकीय आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी 1964 च्या राज्यभाषा अधिनियमाचे काटेकोर पालन व्हायला पाहिजे तेही झाले नाही. याबाबत 'मराठी बाणा' निष्फळ ठरला. मराठी राज्यात मराठी भाषेच्या संवर्धनाचा विचार झाला पण तो कागदोपत्रापर्यंतच राहिला. आपली प्रादेशिक अस्मिता अशी तकलादू होती. मराठी भाषा ही मराठी माणसांच्या नसानसातून सळसळण्यापेक्षा सगळ्या पाट्या मराठीत पाहिजेत. नाहीतर

बघून घेऊ इतपर्यंतच राहिली. मराठी माणसाला ज्या ज्या मानवसमूहांनी आपली भाषा गमावली त्या त्या मानवसमूहांची संस्कृती मृतप्राय व्हायला वेळ लागला नाही हे कळले नाही. प्रादेशिकता महत्त्वाचीच पण त्यासोबत भाषाही महत्त्वाची आहे. आपली भाषा, संस्कृतीसोबत जगत–वाढत असते व मृतप्रायही होत असते. भाषा ही आपल्या संवेदना, भावना, विचार यांनी युक्त असते. ती आपल्या नेणिवेतल्या संवेदकांना आकार देत असते. तसेच आपल्या नेणिवेतील संस्कृतीचे वहनही करीत असते. त्याच कारणासाठी मराठी माणसाने आपले मराठीपण जपले पाहिजे. त्यासाठी काही उपाय अंगिकारता येतील काय? हा विचार महत्त्वाचा वाटतो.

अलीकडे इंग्रजी शाळांचे आक्रमण वाढते आहे. आपल्याच माणसांनी त्याला मोठा प्रतिसाद दिला. इंगजी शाळांचा आग्रह धरला. पण मराठी शाळांचे काय? इंग्रजी शाळांचा आग्रह धरला तर इंग्रजी शाळेमधील मराठी भाषेच्या विषयाचे काय? हा प्रश्न उपस्थित करणे म्हणजे इंग्रजी भाषेचा द्वेष करणे नव्हे, तर रवींद्र बेडकिहाळ म्हणतात त्याप्रमाणे, ''इंग्रजी भाषा आत्मसात करूनही मराठीचा त्याग करावा लागणार नाही असे आपले धोरण पाहिजे.''[2] महाराष्ट्रातही पाचवी ते दहावीपर्यंतचे सर्व शिक्षण राज्य भाषेत करायला पाहिजे. त्यानंतर उच्च शिक्षणात मराठीचा वापर वाढवत नेला पाहिजे. बहुसंख्यांपर्यंत ज्ञान पोचवायचे असेल तर त्यांच्या स्थानिक भाषेत शिक्षण दिले पाहिजे, ही नीती असायला हवी. यासाठी इंग्रजी शिकविणे बंद करण्याची गरज नाही. उलट आपल्या मातृभाषेचा पाया भक्कम करून इंग्रजीवर प्रभुत्व मिळविण्याचे प्रयत्न हवे. परंतु महाराष्ट्रात राज्य शिक्षणासंबंधीच्या नियमाने मराठी शाळा बंद पडण्याच्या मार्गावर असून इंग्रजीतील कॉन्व्हेंट संस्कृती वाढीस लागली आहे. यातील शिक्षण हे इंग्रजी भाषेतील असून 'मराठी' ही दुय्यम भाषा आहे. ही नीती मराठीच्या ऱ्हासास अत्यंत घातक आहे. असे झाल्यास मराठी शाळांना तिलांजली देण्याची वेळ येईल. मराठी भाषा भावी पिढीला येणार नसेल तर मराठी भाषेचे संवर्धन होईल कसे? मराठी भाषेबद्दल टणभर बोलणारे आपल्या मुलांना इंग्रजी शाळेमधून शिक्षण देतात. उच्च शिक्षणासाठी मुलं परदेशात पाठवतात. त्यामुळे शासनाचे तर सोडाच सामान्य मध्यमवर्गीयांना सुद्धा मराठीचे सोयरसुतक राहिले नाही. इंग्रजी माध्यमांच्या शाळांना आवर घातला नाही तर परिस्थिती अत्यंत बिकट आहे.

मराठी भाषा येणे म्हणजे मराठीतून बोलता येणे व्यवहार करता येणे इतकेच नव्हे. मराठी शाळेतील मराठी भाषेच्या अभ्यासाचाही मुद्दा महत्त्वाचा आहे. मराठी भाषेचे व्याकरण, शुद्धलेखन, अलंकार, वृत्त, छंद, साहित्यातील विविध प्रकार, बोली या सह व्यवहारिक भाषेचे ज्ञान विद्यार्थ्यांना येईल. या सर्व बाबींचा अंतर्भाव अभ्यासात करणे होय. शाळा व महाविद्यालये यातील कोणतीही ज्ञानशाखा असोत त्यात मराठी हा भाषेमधील प्रमुख विषय असायला पाहिजे. मराठी शाळा संपल्या तर मराठी साहित्य तरी कोण निर्माण करील? कोण वाचेल? हे सारे प्रश्न गंभीर होत आहेत. पुन्हा एकदा ही निसटती संधी हातून जावू नये यासाठी मराठी शाळा टिकविणे त्या दर्जेदार करणे ही जबाबदारी शासनासह सर्व मराठी माणसांची आहे.

आधुनिक युगातील अत्यंत वेगवान माध्यमे म्हणजे संगणक आणि मायाजाल ही होत. माहिती, ज्ञान, शिक्षण, अभ्यास, संज्ञापन याचा मराठी भाषेतून वापर करणे सोपे व्हावे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे गरजेचे आहे. इंटरनेट, यु–ट्यूब, ट्विटर, फेसबुक, ई–बुक्स, स्काईप या माध्यमांना सेवा देणाऱ्या कंपन्यावर जगभरातल्या मराठी संगणक उपयोजकांनी आणि मराठी उद्योजकांनी दबाव टाकल्यास त्या सुद्धा आपला मान राखून मराठीतून सेवा देतील. त्यामुळे मराठीच्या जोपासणेस व प्रसारास साह्य होईल.

मराठी भाषा हा भावनिक मुद्दा बनता कामा नये तर मराठी भाषा अर्थाजनास सहाय्यक ठरणारी भाषासुद्धा व्हायला हवी. त्यासाठी मराठी भाषा नोकरी, धंदे, व्यवहार, उद्योजकाशी, रोजगारांशी जोडली गेली पाहिजे. मराठीच्या वापरावे केवळ मानसिक समाधान नव्हे तर आर्थिक संपन्नता व सामाजिक प्रतिष्ठा लाभली पाहिजे. मराठीचे ज्ञान महाराष्ट्रात राहणाऱ्यांना फायद्याचे होईल याचा विचार झाला पाहिजे. त्यासाठी शासनाचे सर्व संकेतस्थळे मराठीमध्ये व्हायला हवेत. सर्व विभागाचे अधिकृत दस्तएवजीकरण, नोंदी करावयाचे करार, दस्त, प्रतिज्ञापत्रे इत्यादी बाबी राज्यभाषेत असायला हव्या. याबाबत सक्त कायदे हवेत. सरकारी व खाजगी नोकऱ्या ह्या स्थानिक लोकांना व भूमिपुत्रांना मिळतील याची अंमलबजावणी व्हायला हवी. उच्च न्यायालयाखालील सर्व कोर्ट व प्राधिकरणाने मराठी भाषेतून शतःप्रतिशत काम करण्याचे नियोजन हवे. शासनाच्या सर्व जाहिराती या मराठीतून प्रसारित व्हाव्यात. सर्व प्रकारचे अनुज्ञप्ती मागतांना मराठी भाषेतून मागितली पाहिजे. उद्योगधंदे व प्रकल्पांच्या दृष्टीने स्थानिक हिताचे कायदे हवेत. या सर्वांबाबत शासकाने कठोर अंमलबजावणीची सक्त करायला हवी. आपल्या भौगोलिक सीमारेषेतील संपूर्ण व्यवहार मराठी भाषेला केंद्रस्थानी ठेवून झाले तरच मराठी भाषेची व मराठी माणसांची उन्नती होईल. कोणतीही भाषा टिकण्यासाठी ती प्रवाहित हवी. जगात उदयास येणारे उत्तमोत्तम, नवनवीन ज्ञान त्या भाषेत सामावून घेण्याचे भाषासामर्थ्य हवे. जगातील इतर भाषामधील उत्तमोत्तम साहित्य, पुस्तके, कोश, ज्ञान–विज्ञान, संशोधने हे मराठी भाषेत आले पाहिजेत. यासाठी शासनाच्या सर्व भाषा विषयक संस्थांनी व साहित्यिकांनी प्रयत्न करायला हवे. जगभरात वेळोवेळी विविध भाषांमधून प्रसारित होणारे उत्तमोत्तम साहित्य हे तत्वतः मराठीतून भाषांतरित व्हायला हवेत. जगभरातील अद्यावत माहिती ताबडतोब मराठीतून उपलब्ध झाल्यास व तशी व्यवस्था केल्यास मराठी भाषेचा व मराठी समाजाचा फायदा होईल.

हिंदी भाषेच्या प्रचार–प्रसाराविषयी किंवा तिच्या टिकण्याविषयी जेव्हा प्रश्न उपस्थित केला जातो तेव्हा मोठ्या अदबीने, 'हिंदी की बात मत करो, हिंदी मे बात करो' असे उत्तर दिले जाते. हा अभिमान स्वभाषेच्या रक्षणासाठी मराठी माणसात जागेल काय? साधा रोजचा दैनंदिन व्यवहार करताना मराठी माणूस मराठीतून बोलत नाही. वाणी सामान, भाजी विकत मागताना मराठीतून मागता येत नाही. रेल्वे, बँक, टपाल, कार्यालये, दुकाने, मॉल, बस, शिक्षा, हॉटेल, सरकारी कार्यालये, जनसंपर्काची खाजगी आस्थापने यात व्यवहारासाठी मराठी माणूस इतर भाषेचा वापर करतो. त्याऐवजी मराठीचा वापर ठरवून केला पाहिजे. इतर परप्रांतीय राज्यातील लोकांसोबत जर मराठी माणूस त्याच्याच भाषेत बोलला तर त्याला मराठी भाषा शिकण्याची गरजच भासणार नाही. उलट आपण मराठीतून व्यवहार केला तर परप्रांतीय लोकांना त्यांच्या दैनंदिन जीवनातील व्यवहारासाठी स्थानिक भाषा शिकावी लागेल. आमच्या राज्यात आमची भाषा शिकणे आवश्यक आहे, हे आपण कृतीने बिंबवले पाहिजे.

देशातील भाषावार राज्य रचनेचा उद्देश असा की, त्या राज्यातील प्रत्येक लोकांना त्याच्या राज्यातील भाषेच्या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक प्रगती साधण्यासाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देणे, सरकारी व खाजगी आस्थापनाचे सर्व व्यवहार व संस्थळे माहिती व सेवा देण्यासाठी स्थानिक भाषेला प्राधान्य देणे. मराठी भाषेच्या विकासासाठी शासनाने दरवर्षी काय केले याची माहिती पुस्तिका प्रसारित करणे याकडे प्रामाणिकपणे लक्ष दिल्यास मराठी भाषा व संस्कृतीचा विकास होईल.

मराठी भाषा तिच्या 52 बोलीसह समृद्ध अशी भाषा आहे. या बोलींचे जतन करणे आवश्यक आहे. कारण या बोलीमुळेच मराठी भाषा टिकून आहे. भालचंद्र नेमाडे यांनी 'साहित्य, संस्कृती आणि जागतिकीकरण' यावर आपले मौलिक चिंतन मांडताना ते लिहितात, ''मराठी वाचवायची मला फिकीर नाही. कारण मराठी अशी वेगळी कोटी नाही. ती खानदेशी, वऱ्हाडी, नागपुरी, झाडी, कोकणी अशा लहान लहान बोलींनी टिकवून ठेवली आहे.[13] हे खरे असले तरी बोलीभाषांना त्यांच्या समृद्ध परंपरेसह टिकवून ठेवणे हा विषय ऐरणीवर आला आहे. यासाठी मराठी बाणा पुन्हा सरसावला तर मराठी भाषेला, संस्कृतीला चांगले दिवस येतील हा आशावाद बाळगायला काही हरकत नाही.

संदर्भ ग्रंथ

1) म. द. हातकणंगलेकर : साहित्य विवेक, प्रतिमा प्रकाशन, पुणे, 1997, पृ. 38
2) रवींद्र बेडकिहाळ : 'मराठीची घालमेल' (संपा. उत्तम कांबळे, 'जागतिकीकरणातील सांस्कृतिक संघर्ष'), सुगावा प्रकाशन, पुणे, 2013, पृ. 105
3) भालचंद्र नेमाडे : 'साहित्य संस्कृती आणि जागतिकीकरण', लोकवाङ्मयगृह, मुंबई, 2003, पृ. 20